सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २१२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### 'महाराष्ट्रात बँक कर्मचाऱ्यांना मराठीत बोलावंच लागणार' : निर्मला सितारमण



मुंबई : महाराष्ट्रात राहून मराठी बोलणार नाही, असे अरेरावीने सांगण्याच्या घटना वारंवार समोर येत असतात. विशेषत: सरकारी कार्यालयांमध्ये असे प्रकार घडले तर संतापजनक असते. महाराष्ट्रातील बँकांमध्ये आता कर्मचाऱ्यांना ग्राहकांशी मराठीतच बोलावे लागणार आहे. अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी स्थानिक भाषांमध्ये बोलण्यासंदर्भात स्पष्ट शब्दात निर्देश दिले आहेत. काय आहे नेमकं प्रकरण? सविस्तर जाणून घेऊया. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना ग्राहकांशी अधिक घनिष्ठ नाते निर्माण करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी एक महत्त्वपूर्ण सूचना दिली आहे. बँकांच्या शाखांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला त्या भागातील प्रादेशिक भाषेचे पुरेसे ज्ञान असावे, असे त्यांनी सांगितले. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एका कार्यक्रमात बोलतानात्यांनी हे निर्देश दिले.

### ऑनलाईन घोटाळे रोखण्यासाठी सेबीकडून सोशल मिडिया नेटवर्कला दिले मोठे निर्देश




मुंबई प्रतिनिधी:सेबीने आपल्या नव्या निवेदनात नमूद केले आहे की, नियामक मंडळ सेबीने सगळ्या महत्वाच्या सोशल मिडिया व्यासपीठाला त्यांच्या व्यासपीठाचा ऑनलाईन घोटाळ्यासाठी वापर केल्या जाणाऱ्या घटनांपासून प्रतिरोध केला पाहिजे '. सेबीने यावर परिपत्रक काढले असून सोशल मिडिया व सर्च इंजिन या ऑनलाईन टूल्सचा वापर अनैतिक कारवायांपासून रोखला पाहिजे यासाठी पावले उचलण्याचे निर्देश सेबीने दिले आहेत. यापूर्वी इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ सिक्युरिटीज कमिशन यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक धोरण आखले गेले होते याचं धोरणाशी सुसंगत राहून सेबीने हा निर्णय घेतला आहे या अनुपालनामुळे सोशल मिडिया नेटवर्कला घोटाळेबाजावर करडी नजर ठेवणे अनिवार्य असेल.

### तर माझ्यासह जरांगेंची नार्को टेस्ट अन् ब्रेन मॅपिंग करा : धनंजय मुंडे

मुंबई : मनोज जरांगे यांना धमकी दिल्याप्रकरणी आपली बदनामी होत असल्याचा दावा करत, धनंजय मुंडे यांनी या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे. मुंडे यांनी स्वतःची, मनोज जरांगे यांची आणि या प्रकरणात पकडलेल्या आरोपींची ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट करण्याची तयारी दर्शवली आहे. यासाठी न्यायालयाची परवानगी आवश्यक असल्यास, ती मिळवण्यासाठी स्वतः वकील लावून प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. सत्य काय आहे हे जनतेसमोर यावे, अशी त्यांची भूमिका आहे. मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांपासून इतर नेत्यांविरोधात वापरल्या जाणाऱ्या अपशब्द, विशेषतः महिला नेत्यांविरोधात होणारी टीका यावरही तीव्र आक्षेप घेतला. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे, पण ते ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मिळावे, ही आपली भूमिका असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केले. सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात काहीही तयार करता येते, त्यामुळे सत्य समोर येणे आवश्यक असल्याचे मुंडे यांनी म्हटले.

### अमेरिकेच्या टॅरिफ दबावामध्ये भारताला लागला सर्वात मोठा जॅकपॉट



मुंबई : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर तब्बल ५० टक्के टॅरिफ लावला आहे, भारतानं रशियाकडून तेल खरेदी करू नये अशी त्यांची भूमिका आहे. रशिया भारत आणि चीनकडून मिळणाऱ्या पैशांचा वापर हा युक्रेनविरोधातील युद्धात करत असल्यामुळे रशिया आणि युक्रेनमध्ये युद्धविराम होत नसल्याचा आरोप अमेरिकेनं केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भरतावर ५० टक्के तर चीनवर तब्बल १०० टक्के टॅरिफ लावला आहे, तसेच त्यांनी अनेकदा असा दावा देखील केला आहे, की आपण रशियाकडून करण्यात येणार्या तेलाची खरेदी कमी करू असं आश्वासन आपल्याला भारतानं दिलं आहे. मात्र अजूनही भारताची रशियाकडून तेलाची खरेदी सुरूच आहे. दरम्यान आता आंतरराष्ट्रीय बाजारातून भारतासाठी एक गुड न्यूज समोर आली आहे, यामुळे भारताचा मोठा फायदा होणार आहे. सौदी अरेबीयाची तेल कंपनी असलेल्या अरामकोकडून डिसेंबरच्या डिलिव्हरीसाठी कच्च्या तेलाच्या दरात मोठी कपात करण्यात आली आहे.

# बिहारला नको 'कट्टा सरकार'! पंतप्रधान मोदींचा महाआघाडीवर जोरदार हल्लाबोल

औरंगाबाद : बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी औरंगाबाद येथील एका जाहीर सभेत महाआघाडीवर जोरदार टीकास्त्र सोडले. 'जंगलराज'चे राजकारण करणाऱ्या लोकांकडे असे सर्व काही आहे, ज्यामुळे राज्यातील गुंतवणूक आणि नोकऱ्या धोक्यात येतात, असा आरोप त्यांनी केला.

'कट्टा सरकार' आणि 'रंगदारी'चा निशाणा

बिहारमधील जनतेला 'कट्टा सरकार' नको आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. महाआघाडीतील विरोधी पक्षांवर हल्ला चढवताना, त्यांनी 'जंगलराज'चे समर्थक लोकांना 'गुंड' बनण्याचे शिक्षण देत आहेत आणि ते सत्तेत आल्यास राज्यात गुन्हेगारी आणि खंडणीचे प्रमाण वाढेल, असे सांगितले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, विरोधक मुलांना 'गुंड' बनवण्याबद्दल आधीच बोलत आहेत. त्यांची सरकार आल्यास 'बंदुका', 'दोनाली', 'खंडणी' आणि 'गुंड' हे सर्व परत येईल, असे ते उघडपणे घोषित करत आहेत. ते पुढे म्हणाले, बिहारला बंदुकांचे सरकार नको आहे. बिहारला कुशासनाचे सरकार नको आहे. जंगलराजच्या लोकांकडे असे सर्व काही आहे, जे गुंतवणूक आणि नोकऱ्यांसाठी हानिकारक आहे. तुम्हाला त्यांच्यापासून सावध राहायचे आहे. बिहारला 'कट्टा' आणि वाईट शासन नको आहे... छऊ- बिहारला विकसित करेल. छऊ- च्या प्रामाणिक




जाहीरनाम्यावर बिहारचा विश्वास आहे.

जागावाटप आणि तेजस्वी यादव यांच्यावर पीएम मोदींचा हल्ला

पंतप्रधानांनी विरोधी आघाडीच्या जागावाटपावरही हल्ला चढवला. ठगऊने मागील ३५-४० वर्षांत कधीही न जिंकलेल्या जागा काँग्रेसला दिल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, ठगऊ ने बंदुकीच्या जोरावर खछऊख- आघाडीचे मुख्यमंत्री पद चोरले, असा पुनरुच्चार त्यांनी तेजस्वी यादव यांच्यावर टीका करताना केला.

पंतप्रधान मोदींनी बिहारमधील पहिल्या टप्प्यातील विक्रमी मतदानाबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, काल बिहारच्या मतदारांनी सर्व विक्रम मोडले. राज्याच्या इतिहासात इतकी उच्च मतदान टक्केवारी कधीच नव्हती. याचे मोठे श्रेय माता-भगिनींना जाते, ज्यांनी मोठ्या संख्येने मतदान करून टक्केवारी जवळपास ६५ टक्क्यांपर्यंत नेली. यावरून स्पष्ट होते की, त्यांचा नरेंद्र मोदी आणि नितीश कुमार यांच्या ट्रॅक रेकॉर्डवर विश्वास आहे. पंतप्रधानांनी नितीश कुमार यांचे 'जंगलराज' संपुष्टात आणल्याबद्दल कौतुक केले, परंतु काँग्रेसच्या नेतृत्वाखालील णझ- सत्तेत असताना त्यांना त्यांच्या कार्यकाळाच्या पहिल्या नऊ वर्षांत केंद्राकडून सहकार्य मिळाले नाही, असा आरोपही त्यांनी केला.

राम मंदिर आणि कलम ३७० चा उल्लेख

आपण दिलेले आश्वासन पूर्ण करतो, हे दर्शविण्यासाठी पंतप्रधान मोदींनी आपल्या सरकारच्या मोठ्या निर्णयांचा उल्लेख केला. ते म्हणाले, लोकांचा मोदी आणि नितीश यांच्या ट्रॅक रेकॉर्डवर विश्वास आहे, कारण मी जे वचन देतो ते पूर्ण करतो. आज अयोध्येत राम मंदिर उभे आहे, ज्यामुळे ५०० वर्षांचा अन्याय दूर झाला आहे. कलम ३७० रद्द करण्यात आले आहे. आणि, मी बिहारच्या याच भूमीवरून वचन दिले होते की पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दोषींना शिक्षा केली जाईल. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये काय झाले हे तुम्हा सर्वांना माहीत आहे. पंतप्रधान मोदींच्या या भाषणातून, बिहार निवडणुकीत विकास, सुशासन आणि राष्ट्रीय अस्मिता हे मुद्दे प्रभावीपणे मांडले जात असल्याचे स्पष्ट होते.

# ४१६ वर्षांत ४१६ वेळाच उघडले कार्तिकेयाचे मंदिर



ग्वालियर : वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर, राज्यातील एकमेव भगवान कार्तिकेय स्वामी मंदिराचे दरवाजे अखेर मंगळवारी मध्यरात्री १२ वाजता विशेष प्रार्थनेने उघडले. नंतर बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी पहाटे ४ वाजता जीवाजीगंज येथील या जवळजवळ ४१६ वर्षे जुन्या पवित्र स्थळावर भाविकांची दर्शनाला सुरुवात झाली. वर्षातून फक्त एकदाच उघडणाऱ्या या मंदिराला भेट देण्यासाठी राज्यभरातून आणि ग्वाल्हेरसह इतर राज्यांमधून भाविक मोठ्या संख्येने येतात.

मंदिराचे पुजारी बसंत शर्मा आणि आचार्य दिनेश शर्मा यांनी सांगितले की, मंदिराची संपूर्ण स्वच्छता केल्यानंतर, ११ ब्राह्मणांच्या पथकाने भगवान कार्तिकेय स्वामींचा गंगाजलने धार्मिक अभिषेक केला. हा भव्य अभिषेक पहाटे २ वाजेपर्यंत सुरू राहिला. त्यानंतर मंदिराचे दरवाजे पुन्हा वर्षभर बंद राहतील. हे मंदिर त्याच्या अनोख्या परंपरेसाठी प्रसिद्ध आहे, जिथे कार्तिकेयांचे दर्शन फक्त कार्तिक पौर्णमेलाच विशेष महत्त्व आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मंदिराचे दरवाजे वर्षातील ३६४ दिवस बंद राहतात. शापित दर्शन अशीही एक श्रद्धा आहे, ज्यामुळे चोरांनाही मंदिरात प्रवेश करण्याची भीती वाटते. पुत्र कार्तिकेयांचे दर्शन फक्त कार्तिकेय पौर्णिमेलाच मिळते.

### विश्वचषक विजेत्या खेळाडूंसह प्रशिक्षकांचाही राज्य सरकारकडून विशेष गौरव!

# जेमिमा, स्मृती आणि राधा यादव यांना प्रत्येकी २.२५ कोटी!

मुंबई : भारतीय महिला क्रिकेट संघाने आयसीसी महिला विश्वचषक २०२५ जिंकून देशासाठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिका संघाचा ५२ धावांनी दणदणीत पराभव करत प्रथमच हे जेतेपद पटकावले. या ऐतिहासिक विजयानंतर संपूर्ण देशात खेळाडूंचा सन्मान करण्यात येत आहे. दरम्यान, महाराष्ट्र सरकारने विश्वचषक विजेत्या संघातील राज्यातील खेळाडूंना विशेष सन्मानित करण्याची महत्त्वाची घोषणा केली होती, ज्याची पूर्तता आता करण्यात आली आहे. भारतीय महिला संघात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन प्रमुख खेळाडूंना राज्य सरकारने रोख रक्कम देऊन गौरवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार, स्टार फलंदाज




स्मृती मानधना, अष्टपैलू खेळाडू जेमिमा रॉड्रिग्ज आणि उत्कृष्ट फिरकीपटू राधा यादव यांना प्रत्येकी २.२५ कोटी रुपये इतके बक्षीस देण्यात आले आहे. या तिन्ही खेळाडूंनी विश्वचषक विजयात मोलाची कामगिरी बजावली होती. महाराष्ट्र सरकारने त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन दिलेला हा सन्मान राज्यातील इतर खेळाडूंसाठीही मोठा प्रेरणास्रोत ठरणार आहे.

स्मृती, जेमिमा आणि राधा यादव यांना प्रत्येकी २.२५ कोटींचा चेक प्रदान


राज्यातील या तीन स्टार खेळाडूंना प्रत्येकी २.२५ कोटी रुपयांची रोख रक्कम प्रदान करून गौरवण्यात आले. यावेळी कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या अनुपस्थितीत खेळाडूंचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. या कार्यक्रमात केवळ खेळाडूच नव्हे, तर टीम इंडियाच्या यशात मोठे योगदान देणाऱ्यांचेही कौतुक करण्यात आले. महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचाही २२.५ लाख रुपये मानधन स्वरूपात देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे, भारतीय क्रिकेटमधील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल माजी क्रिकेटपटू डायना एडुल्जी आणि टीम इंडियाच्या यशात पडद्याआड राहून मदत करणाऱ्या सर्व सहाय्यक कर्मचाऱ्यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

# पाकिस्तानात 'Gen Z'चा भडका! शाहबाज शरीफ आणि मुनीर यांची धाकधूक वाढली

### नेपाळ, मादागास्करनंतर आता पाकव्याप्त काश्मीरमध्ये युवा पिढीचा रोष

इस्लामाबाद : नेपाळ आणि मादागास्करसारख्या देशांमध्ये 'जनरेशन झेड'ने केलेल्या आंदोलनानंतर आता पाकिस्तानमध्येही ऋश्चप नच्या रोषाचा भडका उडाला आहे. पाकव्याप्त काश्मीर मध्ये सध्या हे आंदोलन सुरू असून, शाहबाज शरीफ सरकार आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांची चिंता वाढली आहे. वाढलेले शैक्षणिक शुल्क, शिक्षण धोरणातील दोष आणि विद्यापीठांच्या परीक्षा व्यवस्थेतील मोठ्या घोळाविरुद्ध युवा पिढी संतापली असून तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी रस्त्यावर उतरली आहे.

या आंदोलनाची ठिणगी मुजफ्फराबाद येथील एका विद्यापीठात पडली. विद्यार्थ्यांनी



फीमध्ये झालेली मोठी वाढ आणि 'डिजिटल मूल्यांकन प्रणाली' मधील गंभीर त्रुटींविरुद्ध आवाज उठवला. विद्यार्थ्यांचा मुख्य आरोप आहे की, परीक्षेचा निकाल तब्बल सहा महिन्यांनी लागला आणि यात अनेक विद्यार्थ्यांचे गुण खूपच कमी आले. तर काही विद्यार्थ्यांना त्यांनी ज्या विषयांची परीक्षा दिलीच नव्हती, त्यातही पास दाखवण्यात आले. जेव्हा विद्यार्थ्यांनी या निकालाची फेरतपासणी करण्याची मागणी केली, तेव्हा प्रशासनाने प्रत्येक विषयासाठी तब्बल १५०० रुपये शुल्क आकारले. या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली.

# दत्तशिखर रोडवर अघोरी विधीचा संशय ?; भाविकांसह नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण!

तभा वृत्तसेवा

माहूर ,दि. ०७ नोव्हेंबर : राज्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्रासह निसर्गरम्य पर्यटनस्थळ असलेले श्री क्षेत्र माहूरगड हे देवदर्शनासाठी येणाऱ्या लाखों भाविकासह पर्यटकांना आकर्षित करणारे धार्मिक स्थळासह ऐतिहासिक शहर व तालुका परिसर असल्याने येथे भाविक व पर्यटकांसह 'अघोरी प्रकार करणारे गुप्तधनाच्या शोधात अनेक हौसे-गौसे-नौसे सुद्धा मोठ्या संख्येने येत असतात. तालुका स्थळासह महत्वाचे शक्तिपीठ असूनही पोलीस बळ कमी असल्याने प्रत्येक ठिकाणी लक्ष देणे शक्य होत नाही. याचा फायदा घेऊन गुप्तधन शोधणाऱ्या टोळ्या किल्ल्यात धुडगूस घालतात तर अघोरी प्रकार करणारे तथाकथित बाबा येऊन येथे अघोरी विद्या सफल करण्याचा प्रयत्न करतात,असाच प्रकार दि.०६ नोव्हेंबर रोजी ऐण दत्तशिखर रोडवर घडल्याने भाविकांसह नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरल्याने पोलिसांनी या गंभीर प्रकाराची चौकशी



करावी,अशी मागणी होत आहे.

दि.०६ नोव्हेंबर रोजी दूपारच्या वेळी काही नागरिक दत्तशिखर मंदिराजवळील रस्त्यावरील पुलाजवळून जात असताना त्यांनी एका महिलेसह दोन पुरुष अघोरी विधी करताना पाहिल्याचे सांगितले. महीला खाली बसून पुजा करत होती तर बाजूला कोयता होता. तसेच त्याठिकाणी रक्ताचे डाग आणि काही पूजाविधीची सामग्री आढळली. महिलेच्या कपाळावर रक्ताचा 'तिलक' लावलेला असल्याचे येणाऱ्या जाणाऱ्या भाविकांनी सांगितले.

विधी संपल्यानंतर स्थानिक नागरिकांनी त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता, सदरील ठिकाणी एक बोकड मृत अवस्थेत आढळले. त्यामुळे नागरिकांमध्ये याठिकाणी अघोरी विद्येचा प्रयोग केला गेला काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकारानंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी पोलिस प्रशासनाकडे तात्काळ तपासाची मागणी केली आहे.

हा अंधश्रद्धेचा प्रकार कि, अघोरी काळी जादूचा प्रकार या विषयी उलटसुलट चर्चा सुरू आहे.

भाविक भक्त मोठ्या संख्येने श्रीक्षेत्र माहूर येथे दर्शनासाठी येतात. त्यामुळे अशा घटनांमुळे धार्मिक वातावरणावर विपरित परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून पोलिसांनी गडासह जंगलात फेरफटका मारण्यासाठी विशेष पथकाची तात्काळ नेमणूक करावी, अन्यथा या आधी घडलेल्या घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याच्या चिंतायुक्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहेत.

# पुणे जमीन गैरव्यवहार प्रकरण, अजित पवारांनी केली सर्वात मोठी घोषणा

मुंबई : पुण्यातील कोरेगाव पार्कमधील तब्बल २ हजार कोटी रुपयांच्या जागेवर पार्थ पवार आणि त्यांच्या अमेडिया कंपनीने सरकारला फसवून डल्लाच मारल्याचा मोठा घोटाळा 'झी २४ तास' ने उडकीस आणला. जुने, खोटी कागदपत्रे जोडून, सरकारचा मुद्रांक शुल्क बुडवून शेकडो कोटींची जागा घेतल्याचा प्रकार समोर आला होता. किरकोळ भावात घेणाऱ्या पार्थ पवार आणि त्यांच्या अमेडिया कंपनीला मोठा दणका बसलाय. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले. काय म्हणाले अजित पवार? सविस्तर जाणून घेऊया.

पुण्यातील कोरेगाव पार्कमधील जमीन गैरव्यवहार प्रकरणातील प्रत्येक घडामोडींवर २४ तासचे लक्ष आहे. त्यामुळे साऱ्या सरकारी यंत्रणांना या प्रकरणाच्या चौकशीसाठी भाग पाडले. त्याचा सगळ्यात मोठा इम्पॅक्ट आता पाहायला मिळतो आहे, तो केवळ 'झी २४ तास'च्या व्यापक, आक्रमक स्टाइलमुळे जेमतेच ४८ तासांच्या आताच कोरेगाव पार्कातील जमीन खरेदी व्यवहार रद्द होण्याच्या मोठ्या हालचाली घडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये माझा मुलगा पार्थ पवार संचालक असलेल्या एका कंपनीच्या जमीन व्यवहारासंदर्भात काही बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यानुसार मी संबंधित अधिकाऱ्यांशी तसेच पार्थशी सविस्तर चर्चा करून सर्व तथ्ये जाणून घेतली आहेत.

# ७० वर्षांनंतर प्रथमतः भारतात भिमटेकडी येथे जागतिक बौद्ध धम्मपरिषदेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : धम्म, शांती आणि करुणेचा जागतिक संदेश पुन्हा एकदा भिमटेकडीवरून जगभर झळकणार आहे. ७० वर्षांनंतर पुन्हा प्रथमच येथे 'जागतिक बौद्ध धम्म परिषद' भव्य आणि ऐतिहासिक पद्धतीने आयोजित करण्यात आली असून, २६, २७, २८ फेब्रुवारी ते १,२ मार्च २०२६ या पाच दिवसीय कालावधीत हा सोहळा पार पडणार आहे.

या परिषदेत २५ देशांमधून, महाराष्ट्रातून भिक्खु व भिक्खुनी संघ दाखल होणार आहेत, तसेच एक लाखांहून अधिक उपासक-उपासिका सहभागी होणार आहेत. या ऐतिहासिक घटनेमुळे छत्रपती संभाजीनगर शहर जागतिक नकाशावर



बौद्धधम्माचे तेज पुन्हा उजळविणार आहे.

कार्यक्रमासाठी २५ एकरांवर विशाल मंडप उभारला जाणार असून, २५ एकरात निवास, भोजनालय, पिण्याचे पाणी, आरोग्यसेवा, सुरक्षा आणि स्वच्छतेच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.एकूण ५० एकर अपरिसरात ही धम्मपरिषद संपन्न होणार आहे. गेल्या दहा महिन्यांपासून जय्यत तयारी आणि नियोजन सुरू असून, शेकडो स्वयंसेवक, उपासक-उपासिका आणि सामाजिक कार्यकर्ते श्रमदान व आर्थिक सहकार्य देत आहेत. या परिषदेला पालकमंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, प्राध्यापक, संपादक, पत्रकार, उद्योजक, साहित्यिक विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमात धम्मतत्त्वांवर आधारित सांस्कृतिक सादरीकरणे, तसेच धम्म शिक्षण, पर्यावरण, धम्मदीक्षा, स्त्रीसक्षमीकरण आणि सामाजिक समता यांसारख्या विषयांवर विशेष परिसंवाद होणार आहेत.

जागतिक धम्म परिषदेच्या अनुषंगाने पत्रकार परिषदेत मुख्य संयोजक पू. भिक्खूनी प्रा. धम्मदर्शना महाथेरी म्हणाल्या की,ही परिषद कोणाच्याही मालकीची नाही ती संपूर्ण मानवतेची, सर्व बुद्ध अनुयायांची आहे. प्रत्येकाने आर्थिक, श्रमिक आणि लोकसहभागाने या जागतिक धम्मपरिषदेच्या यशासाठी योगदान द्यावे. या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक दृष्ट्याही जागतिक ओळख निर्माण करणार आहे, असे पूज्य प्रा. धम्मदर्शना महाथेरी यांनी सांगितले. भिमटेकडी येथे झालेल्या पत्रकार परिषदेला आर्याजी संघशिला, अनिकुमार बस्ते, डॉ. धनराज गोंडाने, विजय मगरे, ॲड. रामेश्वर तायडे, रतनकुमार साळवे,अनिता हिवाळे, सोनाली जोहरे, दीपक लव्हाळे, सुनीत दांडगे, भानुदास डोके,अमोल दांडगे, प्रा. सुनील वाकेकर, जोगेंद्र तायडे, अनिकेत ओव्हाळ, डॉ. प्रकाश इंगळे, मीनाताई काकडे, सुधाकर उमाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शासकीय नियमांना केराची टोपली! : किल्ले धारूर पंचायत समितीत 'मुख्यालय दिनी' २९ पैकी फक्त १८ कर्मचारी हजर; नायब तहसीलदारांनी केला 'पंचनामा'

**खोळंबलेली घरकुल योजना, नागरिक त्रस्त; 'सोमवार-शुक्रवार' मुख्यालय दिनी बहुतांश कर्मचारी गैरहजर. सामाजिक कार्यकर्त्या करपे यांचा पुढाकार; गटविकास अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष!**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.७ नोव्हेंबर**

शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांची गैरसोय आणि कर्मचाऱ्यांची मनमानी किती वाढली आहे, याचे ज्वलंत उदाहरण आज, दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी किल्ले धारूर पंचायत समिती कार्यालयात पाहायला मिळाले. सोमवार आणि शुक्रवार हा 'मुख्यालय दिवस' असतानाही, नायब तहसीलदार दळवी आणि त्यांच्या पथकाने केलेल्या अचानक तपासणीत (पंचनामा) कार्यालयातील २९ पैकी केवळ १८ कर्मचारी हजर आढळले. उर्वरित सर्व कर्मचारी गैरहजर असल्याने घरकुलाच्या कामासाठी आलेल्या महिलांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

घडले काय? : खोळंबलेल्या घरकुलांसाठी महिला त्रस्त

घरकुलासंदर्भातील कामासाठी आलेल्या अनेक महिलांना आज पंचायत समिती कार्यालयात ताटकळत बसावे लागले. विस्तार अधिकारी (राठोड) यांच्यासह विभागातील कर्मचारी उपस्थित नव्हते. यामुळे संतप्त झालेल्या सामाजिक कार्यकर्त्या मनीषा करपे आणि उपस्थित महिलांनी तातडीने नायब तहसीलदार दळवी यांना कार्यालयात बोलावून घेतले. दळवी साहेबांनी तातडीने हजेरी रजिस्टर तपासले आणि कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीचा पंचनामा केला.

शासकीय नियमांचे उल्लंघन आणि कर्मचाऱ्यांची मनमानी

पंचायत समिती स्तरावरील शासकीय नियमानुसार, कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी (धारूर) निवास करणे बंधनकारक आहे. परंतु, नायब तहसीलदार यांच्या चौकशीत शिपाई वगळता बहुतांश कर्मचारी आंबेजोगाई, केज, वडवणी, बीड येथून 'ये-जा' करत असल्याचे उघड झाले. कर्मचाऱ्यांच्या या



गैरजबाबदारपणामुळे त्यांच्या कामात लक्ष लागत नाही आणि परिणामी नागरिकांना मोठा संघर्ष व आर्थिक नुकसान सोसावे लागते, अशी तक्रार सामाजिक कार्यकर्त्यांनी पंचनामा करताना नोंदवली.यावेळी, मनीषा करपे यांनी नायब तहसीलदारांकडे मागणी केली की, जे कर्मचारी मुख्यालयात निवास करत नाहीत, त्यांचे घरभाडे आणि सोयी-सुविधा तत्काळ थांबवाव्यात आणि त्यांना मुख्यालयात निवास करण्यास कायदेशीररित्या बाध्य करावे.

दळवी आश्वासन : कठोर कारवाईची शक्यता

पंचनामा पूर्ण झाल्यानंतर नायब तहसीलदार दळवी यांनी उपस्थित महिला व कार्यकर्त्यांना आश्वासन दिले की, सदर पंचनामा व संपूर्ण अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे त्वरित पाठविण्यात येईल आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या या सर्व गैरहजर व निष्काळजी कर्मचाऱ्यांवर शासकीय नियमानुसार योग्य ती कठोर कारवाई करण्यात येईल.

प्रशासनासमोर आव्हान : कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव कधी होणार?

पंचायत समितीसारख्या महत्त्वपूर्ण कार्यालयात 'मुख्यालय दिनी' अशी गंभीर परिस्थिती असणे, हे गटविकास अधिकारी आणि वरिष्ठ प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह निर्माण करते. गैरहजर कर्मचाऱ्यांवर दळवी केलेला पंचनामा हा कायदेशीर कारवाईचा आधार ठरला आहे.आता गटविकास अधिकारी आणि वरिष्ठ प्रशासन, मुख्यालयात न राहणाऱ्या आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या या कर्मचाऱ्यांवर वेतनासंदर्भात (घरभाडे) आणि नियमानुसार निवासस्थानासंदर्भात काय कार्यवाही करते, याकडे किल्ले धारूरच्या नागरिकांचे 'लक्ष' लागले आहे. नागरिकांचा संघर्ष कधी थांबणार, हाच खरा प्रश्न आहे!

# पाण्याचा प्रश्न मिटवणार! : 'नगराध्यक्षपदाच्या काळात २४ कोटींची योजना आणली; आता पूर्ण करून मुबलक पाणी देणार'-अर्जुन गायकवाड

**धारूर नगरपरिषदेची निवडणूक रंगात; राष्ट्रवादी (शरद पवार गट) उमेदवाराची प्रचारात आघाडी. 'आम्ही नागरिकांच्या दारी' उपक्रमातून जनतेचा विश्वास संपादन, पी.टी.आर. चा प्रश्नही मार्गी लावण्याचे आश्वासन**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ नोव्हेंबर**

धारूर नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) तर्फे नगराध्यक्षपदाचे उमेदवार आणि माजी नगराध्यक्ष अर्जुन गायकवाड यांनी आपल्या प्रभावी प्रचारातून मोठी आघाडी घेतली आहे. 'आम्ही नागरिकांच्या दारी' या उपक्रमातून ते शहराच्या प्रत्येक प्रभागात कॉर्नर बैठका घेत असून, जनतेचा थेट विश्वास संपादन करत आहेत.

'कुंडलिका योजने'चा भावनिक मुद्दा



प्रभाग क्रमांक १० मधील कॉर्नर बैठकीत बोलताना अर्जुन गायकवाड यांनी धारूरच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या 'पाणी प्रश्ना'वर थेट भावनिक साद घातली. धारूरचा पाणीप्रश्न माझ्या नगराध्यक्षपदाच्या काळातच कायमस्वरूपी मिटला होता, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले.

मी स्वतः २४ कोटी रुपयांची महत्त्वाकांक्षी 'कुंडलिका पाणी योजना' प्रस्तावित केली होती. मधल्या काळात ही योजना थांबली असली तरी, येणाऱ्या निवडणुकीत तुम्ही मला साथ द्या. मी तुम्हाला वचन देतो, आपल्याच नगराध्यक्षपदाच्या काळात शहराला मुबलक आणि सुरळीत पाणीपुरवठा निश्चितपणे सुरू होईल, असे आश्वासन अर्जुन बप्पा गायकवाड यांनी दिले. त्यांचे हे प्रतिपादन नागरिकांना दिलासा देणारे ठरले आहे.

पी.टी.आर. प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही

प्रचारादरम्यान, त्यांनी केवळ पाणीच नाही, तर प्रभागातील जनतेच्या अनेक समस्या जाणून घेतल्या. यात 'पी.टी.आर.' संबंधीच्या मुद्द्यावर नागरिकांकडून मागणी झाल्यावर त्यांनी त्वरित प्रतिसाद दिला. आपली सत्ता आल्यास पी.टी.आर. (मालमत्ता कर नोंद) संबंधी योग्य विचार करून नागरिकांना दिलासा देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

अर्जुन गायकवाड यांचा अनुभव, लोकांमध्ये मिसळण्याची तयारी आणि विकासाचा दृष्टीकोन यामुळे ते एक लोकप्रिय उमेदवार म्हणून जनतेच्या पुढे येत आहेत. शहरातील नागरिकांकडून त्यांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, प्रचारात त्यांनी मोठी आघाडी घेतली आहे.

# रामतिर्थावर प.पू. दादा महाराज खडकीकर

## पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, शिवमहापुराणकथा व विविध कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ नोव्हेंबर**

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा बुधवार दि.१२ नोव्हेंबर पासुन ते बुधवार १९ नोव्हेबर २०२५ पर्यंत आयोजित केला आहे.

यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्री शिवमहापुराण कथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ शिवमहापुराणकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. शिवमहापुराण कथाप्रवक्ते हभप भागवताचार्य अनिल महाराज जोशी माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने बुधवार दि.१२ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल.

# वंदेमातरम् गीताने स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग पेटविले-कमलाकर चौसाळकर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.७ नोव्हेंबर**



येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या नाट्य शास्त्र , सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने वंदेमातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती व मराठी रंगभूमी दिनानिमित्त महाविद्यालयात वंदेमातरम् व नाटचगीते गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांनी भूषविले. वंदेमातरम् गीताने स्वातंत्र्य चळवळीचे स्फुल्लिंग पेटविले असे मत कमलाकर चौसाळकर यांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख यांनी वंदेमातरम् गीताची पार्श्वभूमी सांगीतली.हैदराबाद मुक्ती संग्रामात वंदेमातरम् या शब्दाने लढावू वृत्ती निर्माण झाली. अनेक तरुण देशाच्या स्वातंत्र्यासाठी हसत हसत फासावर गेले वंदेमातरम् या गीताने स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले असे मत व्यक्त केले. महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. रमेश सोनवळकर यांनी आपली भूमिका व्यक्त केली. बंकिमचंद्र चटर्जी यांच्या वंदेमातरम् गीताने ब्रिटिश सरकारच्या विरोधात लढण्याचे एक शस्त्र दिले असे मत व्यक्त केले. २४ जानेवारी १९५० ला भारतीय राज्यघटनेने वंदेमातरम् गीताला राष्ट्रीय गीत म्हणून मान्यता दिली. बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या जीवन कार्यावर त्यांनी प्रकाश टाकला. स्वातंत्र्य संग्राम काळात वंदेमातरम् गीत हिंदू - मुस्लिम ऐक्याचे प्रतिक बनले होते असे मत व्यक्त केले. १८९६ च्या कोलकाता काँग्रेस अधिवेशनात रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम हे गीत गायले पण हे गीत १८७५ मध्येच बंकिमचंद्रांनी लिहिले होते. या गीताचा सामाजिक, राष्ट्रीय आशय समजून घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. खोलेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी यज्ञेश धाट याने वंदेमातरम् संपूर्ण गीताचे गायन केले तसेच कांही नाट्य पदे सादर केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाट्यशास्त्र तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. संपदा कुलकर्णी यांनी केले मराठी रंगभूमीचे जनक पं. विष्णूदास भावे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाट्यशास्त्र विभागाचा विद्यार्थी आविष्कार जंगले याने केले तर आभार प्रदर्शन एन. एस. एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी मानले. या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. रमेश सोनटक्के , कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य जितेंद्र देशपांडे, पदव्युत्तर विभागाच्या संचालिका डॉ. शैलजा बरुरे, गुणवत्ता हमी मंडळाचे प्रमुख डॉ. गंगाधर आकलोड कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. श्रीकांत जवळगावकर, कार्यालयीन अधीक्षक श्रीहरी रामदासी, ग्रंथपाल डॉ. पी. सी. गादेकर, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराईत उद्या भाजपच्या बैठकीला उपस्थित रहा-शिवराज पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ नोव्हेंबर**



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेवराईत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजप नेते बाळराजे पवार व माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या उपस्थितीत भाजपच्या इच्छुक उमेदवारांची बैठक आयोजित करण्यात आली असून निवडणुकीसाठी इच्छुक भाजप उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. या बैठकीला बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन युवानेते शिवराज पवार यांच्यासह भाजपा पदाधिकाऱ्यांनी केले आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार हे दोघेही भारतीय जनता पार्टीत एकत्र आल्याने नगर परिषद, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद निश्चितच वाढलेली आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी भाजपमध्ये इच्छुकांची सुद्धा गर्दी वाढल्याचे दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत इच्छुक असलेल्या भाजप उमेदवारांची मुलाखत घेण्यासाठी दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी गेवराई शहरातील कोल्हार रोडवर असलेल्या गजानन मंगल कार्यालय येथे सकाळी ११ वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला भाजप जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, भाजपा नेते बाळराजे पवार, माजी मंत्री बदामरावजी पंडित, माजी जिल्हा परिषद सभापती युधाजित पंडित, प्रदेश कार्यकारणी सदस्य सर्जेराव तांदळे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, जिल्हा उपाध्यक्ष सुंदर चव्हाण, जिल्हा सचिव ड सुरेश हात्ते, युवा नेते रोहित पंडित, समन्वयक गेवराई विधानसभा श्रीकांत सानप, भाजपा ज्येष्ठ नेते प्रकाश सुरवसे, सचिन दाभाडे, मनोज पाटील, राजेश पवार, उद्धव रासकर, सौ रूपालीताई कचरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या बैठकीला गेवराई विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकीसाठी इच्छुक कार्यकर्त्यांनी तसेच बदामराव पंडित मित्र मंडळातील सर्व ज्येष्ठ व युवा कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजप युवा नेते शिवराज पवार यांच्यासह सर्व भाजपा पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात वंदे मातरम सार्ध शती समारोह सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि.७ नोव्हेंबर**







लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात वंदे मातरम सार्ध शती सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रुक्मण पेन्सलवार स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुने, वसंतराव कलकोटे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी ,उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार अभ्यास पूरक मंडळ प्रमुख अनिता यलमटे या सर्व मान्यवरांच्या हस्ते भारत माता व बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या अनिता यलमटे यांनी वंदे मातरम गीताचा अर्थ व निर्मिती याविषयीची सखोल माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. या गीताने भारतीय स्वतंत्र चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. एकूणच धगधगता इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

यानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी यांनी अत्यंत हृदयस्पर्शी असे वक्तव्य केले वंदे मातरम या शब्दात त्याग, राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम दिसून येते असे विचार मांडले.वंदे मातरम या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामूहिक वंदे मातरम घेण्यात आले.यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वंदे मातरम् गीता विषयीची माहिती व काही क्रांतिकारकाची माहिती प्रदर्शनीच्या माध्यमातून तयार केली या प्रदर्शनीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अदिती व तेजस्विनी या विद्यार्थिनीने केले प्रास्ताविक श्रेया मुंडे व आभार अंजली जाधव या विद्यार्थिनींनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख विष्णू तेलंग ,प्रीती शेंडे संतोष गजलवार ,लक्ष्मी चव्हाण, आशा कल्पे, सुप्रिया बुधे , छाया दिक्कतवार व व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात संपूर्ण वंदे मातरम गीत गायन

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.७ नोव्हेंबर**

आज सकाळच्या प्रार्थना सभेत वंदे मातरम या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्या बद्दल सकाळच्या परिपाठामध्ये वंदे मातरम राष्ट्रीय गीत सादर करण्यात आले. त्याप्रसंगी या गीताबद्दल सविस्तर माहिती श्री. योगेश दातीर सर यांनी दिली. त्यांनी बोलताना सांगितले की ब्रिटिश राजवटी पासून तर दीडशे वर्षापर्यंत इंग्रजांचं राज्य आपल्या देशावर होते. त्यावेळी प्रत्येक क्रांतिकारकांनी वंदे मातरम या एक शब्दामुळे देशात नवीन क्रांती घडवून आणली. वंदे मातरम हे गीत आनंद मठ या कादंबरीतून घेऊन या गीताला राष्ट्रीय गीत दर्जा देण्यात आला. आहे १९५० मध्ये या गीताचे दोन कडवे आज आपण देशामध्ये म्हणत आहोत. तसेच अध्यक्षीय समारोप शाळेचे मुख्याध्यापक श्री.प्रदीप जोशी सर यांनी केले. अध्यक्षीय समारोपात बोलताना देशातील क्रांतीकारकांनी देशभक्तीची प्रेरणा घेऊन इंग्रजाच्या



गुलामगिरीतून सुटका केली. अशा पद्धतीने आपण देखील आपल्या जीवनामध्ये नवीन क्रांती घडवून आणण्याचे प्रयत्न करावे.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.अनिल चव्हाण सर यांनी केले. आभार श्री. गणराज जाधव सर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता संपूर्ण वंदे मातरम या गीताने झाली.

# संस्कार भारती बीडचा दिपोत्सव दिप वंदेमातरम ने साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ नोव्हेंबर**

संस्कार भारती बीड च्या वतीने प्रतिवर्षी प्रमाणे कार्तिकी पौर्णिमेला घेण्यात येणारा दीपोत्सव दि.५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी खंडेश्वरी परिसरातील दिपमाळांवर दिप वंदेमातरम ने साजरा करण्यात आला.

वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत.यानिमित्त यावर्षी उजळणाऱ्या दिव्यांच्या प्रकाशात वंदे मातरम हि अक्षरे भूअलंकरणाने सजली होती. कार्यक्रमची सुरवात सामुहीक संस्कार भारती गीताने करण्यात आली.त्या नंतर ज्योत से ज्योत लगाते चलो या गाण्यावर संस्कार भारतीच्या सर्व कलासाधकांनी २०२५ पणत्या प्रज्वलित केल्या .प्रारंभी प्रमोद वझे,





लक्ष्मीकांत खडकीकर, महेश देशमुख यांनी रांगोळीतुन वंदेमातरचे रेखाटन केले.वंदेमातरम या गीतावर अनुराधा चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली साई नृत्यालयाच्या गार्गी जोशी,वेदिका वडवणीकर,प्रांजल सुर्यवंशी व नंदीनी गुरखुदे यांनी भरतनाट्यम सादर केले.विवेक काटे व श्रीमती आशा भारती यांनी देशभक्ती व दिवाळीची गाणी सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.संस्कार भारतीचे संरक्षक कै.प्रभाकरराव महाजन सरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद वझे यांनी तर सुत्रसंचलन सुरेश साळुंके यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भरत लोळगे,वासुदेव निलंगेकर, जिल्हा अध्यक्ष लक्ष्मीकांत सौंदत्तीकर, संतोष पारगावकर,अनंत सुतनासे , गणेश तालखेडकर, अनिल कुलकर्णी, अशोक कुलकर्णी, राहुल पांडव स्नेहा पारगावकर सोनल पाटील यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वी केला.

# स्वामी विवेकानंद विद्यामंदिर शाळेमध्ये भारतमातेच्या स्तुतीचा गौरव दिन 'वंदे मातरम' गीताचे सामूहिक गायन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.७ नोव्हेंबर**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेच्या प्रांगणामध्ये श्रीमंत सरदार महादजी शिंदे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था केजच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ नोव्हेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी भारतमातेच्या स्तुतीचा गौरव दिन ' वंदे मातरम' या गीताच्या १५० वर्षपूर्तीनिमित्त सामूहिक गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अध्यक्ष म्हणून ह.भ.प. केशव महाराज सारूक शास्त्री, श्रीकृष्ण आश्रम केज हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शशिकांत गव्हाणे, भारतीय किसान संघ मराठवाडा समन्वयक यांनी उपस्थिती दर्शवली. इतर उपस्थित मान्यवरांमध्ये सुनील केंद्रे, गटशिक्षणाधिकारी केज. व्ही. एम नागरगोजे, गटविकास अधिकारी पंचायत समिती केज. जी.बी. गदळे, सचिव- जीवन विकास शिक्षण मंडळ केज, ए.पी.आय. मांजरमे साहेब, अहंकारे साहेब, पोलीस स्टेशन केज. विष्णु महाराज शास्त्री, हनुमंत घाडगे, शैलाताई इंगळे, अध्यक्षा- शालेय व्यवस्थापन समिती. शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, गणेश कोकीळ मु. अ. स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल. प्राचार्य शंकर भैरट, ज्येष्ठ पत्रकार गौतम बचुटे, एकनाथ गोरे, धनराज पुरी, मुसळे सर, रोडेवाड सर, मुंडे सर, विनोद गुंड तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद आदी उपस्थित होते.

## श्याम ग्लोबल टेक्नोवेंचर्स कडून 'इंटेलीपार्क'

मुंबई: वेगाने वाढणारे शहरीकरण आणि मर्यादित जागा यामुळे देशातील महानगरांमध्ये पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. प्रत्येक कुटुंबाकडे एकापेक्षा अधिक वाहने असताना, पार्किंगसाठी जागा कमी पडते आहे. या आव्हानाला उत्तर देण्यासाठी श्याम ग्लोबल टेक्नोवेंचर्स प्रा. लि. ने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'इंटेलीपार्क – स्पेस सेविंग स्मार्ट पार्किंग सिस्टम' विकसित केली आहे. कंपनीचे संचालक नरेंद्र गोयल म्हणाले, इंटेलीपार्क हे आधुनिक, सुरक्षित आणि स्मार्ट शहरांसाठी तयार केलेले भविष्यदर्शी समाधान आहे. हे सिस्टम पूर्णपणे ऑटोमेटेड असून मानवी हस्तक्षेपाशिवाय कार्य करते.

## स्वादुपिंडासाठी विशेष ओपीडी सेवा सुरू

सोलापूर: नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांनी आज सोलापूर येथील संजीवनी हॉस्पिटल आणि डॉ. कोठे यांचे गॅस्ट्रो लिव्हर केअर आणि जीआय एंडोस्कोपी सेंटर यांच्या सहयोगाने हेपॅटोबिलिअरी, स्वादुपिंड (पॅन्क्रिएटिक) आणि आतडे (इंटेस्टाइनल) उपचारांसाठी विशेष ओपीडी सेवा सुरू केल्या. या सेवांचा शुभारंभ डॉ. गौरव चौबल, संचालक – एचपीबी सर्जरी, लिव्हर आणि मल्टी–ऑर्गन ट्रान्सप्लांट, नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

## नवीन रोबोटिक सर्जिकल तंत्राची आंतरराष्ट्रीय नियतकालिकेत नोंद

पुणे : ज्येष्ठ मुत्ररोग तज्ञ व एस हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. सुरेश पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली मुत्ररोग तज्ञ डॉ.गुरूराज पडसलगी,डॉ.सचिन भुजबळ, डॉ.सौरभ उपलेंचवार यांनी नुकतेच मुत्रपिंडासंबंधी गुंतागुंतीच्या परिस्थितीवर रोबोटिकच्या साहाय्याने लॅप्रोस्कोपिक पायलोलिथुमी आणि बक्कल म्युकोसल ग्राफ्ट (बीएमजी) या एकाच वेळी दोन प्रक्रिया केल्या.हे नवीन तंत्र गुंतागुंतीच्या मुत्रपिंडाच्या स्थितीत रोबोटिक तंत्रज्ञानाच्या वापरामध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे. शास्त्रीय नियतकालिकेमध्ये प्रकाशित होणारी अशा प्रकारची जगातील ही पहिलीच रोबोटिक शस्त्रक्रिया आहे.

## मोर हे कार्तिकेयाचे वाहन कसे झाले

सोनी सबवरील 'गणेश कार्तिकेय' मालिकेत प्रेक्षक भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेनु परीख) आणि त्यांची मुलं गणेश (एकांश कथुरिया) आणि कार्तिकेय (सुभान खान) यांची कहाणी बघत आहेत आणि या दिव्य कुटुंबातील प्रेम, उद्देश आणि वैश्विक संतुलनाचा अनुभव घेत आहेत. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी भृंगी ऋषींचे (रॉबिन दास) आगमन झाल्याचे पाहिले. भगवान शिवाच्या चरणी अपार निष्ठा असलेल्या या ऋषींकडून शक्ती मातेचे अवहेलना होते. त्यांना याचे ज्ञान करून देण्यासाठी भगवान शिव अर्धनारीश्वर रूपाचे दर्शन त्यांना देतात. या रूपात अर्धा देह शिवाचा आणि अर्धा देह पार्वतीचा असतो. स्त्री आणि पुरुषाच्या ऊर्जेचे हे एकात्म रूप आहे.

## 'जगद्धात्री' १० नोव्हेंबर पासून प्रेक्षकांच्या भेटीला

संभाजीनगर : भारतभरात अनेक स्त्रिया अशा लढाया लढत आहेत ज्या जगाच्या नजरेपासून लपलेल्या असतात. काही लढाया ऑफिसच्या बोर्डरूममध्ये घडतात, काही क्लासरूममध्ये, तर अनेक घराच्या चार भिंतींमध्ये – जिथे त्यांचा आवाज अनेकदा दाबला जातो. तरीसुद्धा, या स्त्रिया शांतपणे पण ताकदीने उभ्या राहतात आणि अशी ओळख घडवतात जीशक्ती कोणीही पुसू शकत नाही. अभिनेत्री सोनाक्षी बत्रा या गुंतागुंतीच्या प्रवासाला जिवंतपणे साकारते. ती साकारत असलेली व्यक्तिरेखा कुटुंबाच्या नजरेत नाजूक आणि दुर्बल वाटते, पण तिचे स्वतःचे खरे रूप स्वीकारल्यावर ती अजेय बनते.'जगद्धात्री'सूडाने नव्हे, तर सत्याने प्रेरित आहे. झी टीव्हीचे चीफ चॅनल ऑफिसर मंगेश कुलकर्णी म्हणाले, झी टीव्हीमध्ये आमच्या कथाकथनाचा पाया नेहमीच स्त्रियांच्या अढळ आत्म्याच्या सन्मानावर आधारित राहिला आहे.

# संत नामदेव घुमान सद्भावना यात्रेचे छत्रपती संभाजीनगर येथे जोरदार स्वागत



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्रातील भाविकांना अध्यात्म, पर्यटन, इतिहास आणि संस्कृतीचा अनोखा अनुभव प्रत्यक्षात दिलेली नानक साई फाऊंडेशनची ११ वी घुमान यात्रा पंजाब हरियाणा हिमाचल प्रदेश व दिल्ली येथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन आज ६ नोव्हेंबर रोजी नांदेड येथे परत जाताना छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्टेशनवर जोरदार स्वागत करण्यात आले.

पानिपत युद्धात शहीद झालेल्या मराठा विराना वंदन करून राजधानी दिल्ली येथे दाखल झालेली घुमान सद्भावना यात्रा काल रात्री मराठवाडा संपर्क क्रांती एक्सप्रेस ने छत्रपती संभाजीनगर मार्गे नांदेड कडे रवाना झाली. यात्रेत १८० जण सहभागी आहेत. नानक साई फाउंडेशनचे अध्यक्ष श्री पंढरीनाथ बोकारे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविला जातो. छत्रपती संभाजीनगर येथील नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष चरणसिंग पवार, राज्य सहकारी बँक चे माजी विभागीय अधिकारी अरुण कदम, औरंगपुरा राम मंदिर च्या विश्वस्थ मंदाताई व्यवहारे, सूनिल खोचे,अनिल जाधव, सुनील वैद्य,जानराव मेश्राम यांच्या सह २३ जण घुमान यात्रेत सहभागी झाले होते.

संत नामदेव महाराजांनी मराठीचा झेंडा थेट पंजाबपर्यंत नेऊन पंजाब आणि महाराष्ट्रात बंधुभाव निर्माण केला. त्यांच्या कार्याची आठवण कायम ठेवण्यासाठी नानक साई फाउंडेशन दरवर्षी ना नफा, ना तोटा तत्वावर घुमानयात्रेचे आयोजन करण्यात येते. यात्रा आज नांदेड येथे परत गेली असून जळगाव,मनमाड,छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी रेल्वे स्टेशन वर स्वागत करण्यात आले.

# आ. विलास भुमरे यांचा चनकवाडी येथे भव्य नागरी सत्कार

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ : चनकवाडीयेथे गोरख पाटील मोहिते मित्रमंडळ, ग्रामस्थ चनकवाडी तसेच जिल्हा परिषद सर्कल नवगाव–आपेगाव व चांगतपुरी गण यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्याचे लोकप्रिय आमदार माननीय विलास (बापू) संदीपानराव भुमरे तसेच खासदार माननीय संदीपानजी भुमरे यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.



या सोहळ्याचे आयोजन माजी सरपंच माननीय गोरख पाटील मोहिते यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जालिंदर फलके यांनी केले, तर स्वागताध्यक्ष गोरख पाटील मोहिते यांनी आपल्या मनोगतातून ग्रामविकास आणि लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

या प्रसंगी आमदार विलास बापू भुमरे, दादा पाटील बारे, नंदू अण्णा काळे यांच्यासह मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. आमदार भुमरे यांनी आपल्या भाषणात नवगाव–आपेगाव जिल्हा परिषद सर्कल तसेच चांगतपुरी गणातील विकासकामांचा आढावा घेत गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या. आगामी काळात अधिकाधिक निधी उपलब्ध करून विकासकामांना गती देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

सत्कार सोहळ्यात माननीय राजू नाना भुमरे, नंदू अण्णा काळे, बाबुराव पडूळे, दादा पाटील बारे, साईनाथ होरकटे, बालाजी नलभे, सुनील नलभे, संजय सोनारे, बलभीम फलके, राजेंद्र आवटे, किशोर तावरे, शहादेव लोहारे, किशोर चौधरी, विठ्ठलराव डोंगरे, महेश दसपुते आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, विविध सोसायट्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

चानकवाडीचे ग्रामस्थ संतोष बोठे,बलभीम पाटील फलके, ज्ञानदेव पाटील मोहिते, सजन भोसले, कृष्णा भोसले, बबलू कदम, विजय कदम, अनिल मगरे, आसाराम फलके, शंकर कदम, नानासाहेब कदम, भाऊराव वाघमारे, बाबासाहेब मडके, कल्याण कदम, रामेश्वर बावणे, ज्ञानेश्वर बावणे, भगवान कबाडी,जिजा बावणे, निवृत्ती मापारी, राजु मापारी,भाऊराव धरम, सुनील तिजोर, बापू मोहिते, गोविंद खामकर,केशव शिंदे,उद्धव मापारी, भाऊ वाघमारे, उद्धव मापारी, गौतम गायकवाड, मच्छिंद्र मोहिते, संजय मोहिते तसेच महिलावर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याने चनकवाडी परिसरात उत्साहाचे वातावरण


# बहुलखेडा जवळ अपघात, केळीने भरलेला ट्रक पलटी

सोयगाव,दि.७ नोव्हेंबर – केळीने भरलेला ट्रक थेट रस्त्या च्या धाप्यामध्ये फसल्या मुळे पलटी झाल्याची घटना गुरुवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली या घटनेत कोणताही अनर्थ झाला नसून मात्र ट्रक पलटी होऊन केळीचे नुकसान झाले आहे. दरम्यान बहुलखेडा कडून पाचोऱ्या कडे जाणाऱ्या



ट्रक क्र–डी.डी.०१ जि–९८२५ हा केळी भरून जात असताना धाप्या मध्ये अडकून पलटी झाला दरम्यान बहुलखेडा ते पिंपळगाव( हरे) ता.पाचोरा हा सदर रस्ता जिल्हा परिषद अंतर्गत असून या रस्त्यावरील ढापा अतिशय नित्कृष्ट दर्जाचा होता.या धाप्या वरून अवजड वाहने जाणे जिकरीचे झाले आहे. दरम्यान या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी होत आहे.

## प्रामाणिक कर्मचाऱ्याने १.५ लाखांची बॅग परत केली



छत्रपती संभाजीनगर – कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या मार्केटिंग विभागातील कर्मचारी श्री. शंकर साबळे यांनी प्रामाणिकतेचा आदर्श घालून दिला आहे. जालना येथील डॉ. भूषण मणियार यांच्या आईला उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करताना १.५ लाख रुपयांची रक्कम असलेली बॅग बिलिंग काउंटरवर विसरली गेली होती.

श्री. साबळे यांनी ती बॅग सापडताच क्षणाचाही विलंब न करता तिच्या मालकाकडे सुरक्षित परत केली. त्यांचे हे अनुकरणीय कृत्य कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या प्रामाणिकपणा, करुणा आणि नैतिक आचरण या मूल्यांचे खरे प्रतिबिंब असल्याचे प्रशासनाने सांगितले असून, श्री. साबळे यांच्या प्रामाणिकतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वंदेमातरम गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याने भगवती विद्यालय बिडकीन मध्ये समुहगायन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ७ नोव्हेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील भगवती विद्यालय बिडकीन येथे वंदेमातरम गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याने संपूर्ण वंदेमातरम गीताचे समुहगायन घेण्यात आले. तसेच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्तजागतिक विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला. त्याचबरोबर महाराष्ट्रराज्य भारत स्काउटगाईड वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक रायभान रक्ते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले याप्रसंगी शाळेचे श्रीधर जऱ्हाड, कमलाकर काळे, रामनाथ धनवे, सुनील पवार, श्रीम विश्रांती सलगरे, अप्पासाहेब किसवे, आशुतोष झारगड पल्लवी नरवडे व विद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# जिजामाता कन्या विद्यालय, सिल्लोड शाळेत माजी विद्यार्थिनीचा स्नेह मेळावा संपन्न

सिल्लोड प्रतिनिधी

दि. ०६/११/२०२५, रोजी जिजामाता कन्या विद्यालय सिल्लोड शाळेत ३७ वर्षात प्रथमच सन २००३–०४ बॅचमधील विद्यार्थिनीचा स्नेह मेळावा उत्साहात संपन्न झाला जवळपास २२ वर्षानंतर माझी विद्यार्थिनींनी एकत्र येऊन शालेय जीवनाचा पूर्वीसारखाच अनुभव घेतला



शाळेतील नियमित उपक्रमाप्रमाणे शालेय परिपाठ, वेगवेगळ्या विषयांच्या तासिका, खेळ तासिका, हजेरी लावून पूर्वी प्रमाणेच शाळेचा अनुभव घेतला. उपस्थित असलेल्या विद्यार्थिनींनी शालेय विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

या माझी विद्यार्थिनीच्या स्नेहसंमेलनात, चैताली खेसर, गीता पटेल, गायत्री बलरावत, सारिका कोठाळे, जयस्वाल मनीषा, दीपिका वाघ, कविता हिंगे, स्वाती कोठाळे, राजश्री बनसोडे, शारदा मैंद, सविता सोनवणे, वैशाली रत्नपारखी, विद्या खराटे मुलींनी सहभाग नोंदवला विद्यार्थी स्नेह मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र कावले, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. नंदा सपकाळ, जयश्री निकम, कैलास जगताप, माधव गाढे, जितेंद्र भोंडे, श्रीमती. छाया सोनवणे, श्रीमती कविता वाघ, संजय रेगुलवाड, आदींनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा प्रसंगी शाळेतील सदस्य पंढरीनाथ कदम, भगवान दांडगे तसेच विद्यार्थिनी पालक म्हणून श्री कल्याण धायडे यांची लक्षणीय उपस्थिती होती.

# शिवाजीराव अँग्रो कारखाण्याचा तृतीय गळीत हंगामाला प्रारंभ

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ :- पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी बहू मोलाचे असलेल्या नांदर डेरा येथील शिवाजी शुगर शिवाजीराव अँग्रो इंड्रस्टीज प्रा. ली.चे तृतीय गळीत हंगाम खासदार डॉ कल्याण काळे यांच्या शुभहस्ते गव्हाणीत उसाची मोळी टाकून कारण्यात आला. यंदाच्या हंगामात कारखाना विक्रमी गाळाप करेल असा विश्वास यावेळी चेअरमन रवींद्र पाटील काळे यांनी व्यक्त केला.



यांप्रसंगी पंचक्रोशीत ऊस उत्पादक शेतकरी, सभासद कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.

शिवाजीराव अग्रो इंडस्ट्रीज प्रा. लि.नांदर कारखान्याचा सन २०२५–२६ तृतीय ऊस गळीत हंगाम शुभारंभ जालना लोकसभा खासदार डॉ कल्याणराव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. खासदार काळे यांच्या हस्ते क्रेशर, गव्हाण, काटा पूजन तसेच ऊस उत्पादक शेतकरी, मजूर, कामगार यांचा सत्कार कारण्यात आला. यावेळी शिवाजीराव अग्रो इंडस्ट्रीज चे चेअरमन रवींद्र दादा काळे, जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर , भाऊसाहेब जगताप, अशोक डोळस, रामचंद्र शिवाजीराव काळे,मुख्यकार्यकारी अधिकारी एजाज पठाण, मित्रवर्धन काळे, उदयसेन काळे, यशवंतराव काळे, अँड किशोर वैद्य, व्हाईस चेअरमन हरिपंडित गोसावी, श्याम लोहिया अँड किशोर वैद्य, शाखाधिकारी संतोष पा.राऊत, जनरल मॅनेजर जयंत कुलकर्णी, निजाम शेख सह विविध गावाचे सरपंच, उप सरपंच तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमजीएममध्ये गुरू नानक जयंती उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.७ : महात्मा गांधी मिशन तर्फे एमजीएम विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारत येथे गुरू नानक जयंतीचे औचित्य साधून आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमात प्राध्यापक, विद्यार्थी आणि सर्व संबंधितांनी गुरु नानक देवजींच्या शिकवणीचे स्मरण केले.

यावेळी, कुलपती अंकुशराव कदम, एमजीएम स्कूलच्या संचालिका डॉ.अपर्णा कक्कड, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी, एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, शीख बांधव व सर्व संबंधित उपस्थित होते. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सत् नाम सत् नाम सत् नाम जी वाहेगुरू वाहेगुरु वाहेगुरू जी, दमदम वाहेगुरु, कल तारण गुरुनानक आया नानक आया गुरू नायक आया, सत् नाम सत् नाम सत् नाम दा चकर फिराया, सत् गुरू नानक ज्ञान कर्म जान, धन गुरु नानक, हर दिन हर सिमरन, जो जो नामा हर गुण आदि भक्तीपर गीते आणि भजने गाण्यात आली. यावेळी बोलताना रणबीरसिंग मयल म्हणाले, गुरु नानक देव जी यांचे जीवन आणि शिकवण आजही लाखो लोकांना प्रेरणा देते. सर्वांसाठी प्रेम, भेदभाव न करता सेवा आणि ईश्वरावरील अपार भक्तीचा संदेश त्यांच्या शिकवणीत आहे. जीवन जगण्यासाठी गुरु नानक देव जी यांनी तीन उपदेश दिले आहेत. यामध्ये आपल्याला ज्यांनी बनवले आहे त्या ईश्वराचे नामस्मरण करणे, कर्म करणे आणि गरजवंताची मदत करणे या उपदेशाचा समावेश आहे.

# कॅन्सरविरुद्ध जागरुकतेचा निर्धार – मेडिकव्हर हॉस्पिटलचा उपक्रम

## प्रत्येक श्वास महत्त्वाचा या घोषवाक्याखाली जनजागृती मोहिमेची सुरुवात

छत्रपती संभाजीनगर, दि. ७ नोव्हेंबर –कॅन्सर जागरूकता दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने प्रत्येक श्वास महत्त्वाचा या घोषवाक्याखाली कर्करोगविषयी जनजागृती अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश लवकर निदानाचे महत्त्व समजावून देणे व प्रतिबंधक उपाययोजनांचा प्रसार करणे हा आहे.



डॉ. अनुप तोष्णीवाल यांनी सांगितले की, कर्करोगाचे लवकर निदान आणि योग्य उपचार झाल्यास रुग्णाचा जीव वाचण्याची शक्यता अधिक असते. नियमित तपासणी आणि आरोग्यदायी जीवनशैली ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या कर्करोगांवर अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत.

डॉ. आशुतोष तोंडारे यांनी स्तन कर्करोगाविषयी सांगितले की, भारतामध्ये महिलांमध्ये हा सर्वाधिक आढळणारा कर्करोग असून लवकर निदान झाल्यास आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. मॅमोग्राफी आणि क्लिनिकल तपासणी अत्यावश्यक आहेत. 'बायोप्सीमुळे कर्करोग पसरतो' हा समज चुकीचा आहे.

मुखाचा कर्करोग भारतीय पुरुषांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असून तंबाखू, सुपारी, मद्यपान आणि तोंडाच्या अस्वच्छतेमुळे हा आजार वाढतो. तोंडातील जखम, गिळताना त्रास किंवा आवाजात बदल ही लक्षणे दिसल्यास त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास डॉ. विशाल कुटे, डॉ. निकेत मंत्री, डॉ. अनुप तोष्णीवाल, डॉ. आशुतोष तोंडारे आणि डॉ. रचिता बाहेती उपस्थित होते.

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २९८/२०२५

१. रत्नाबाई संतोष सोनवणे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा.गोंदेगांव, ता. सोयगांव, जि, छत्रपती संभाजीनगर, २. किशोर संतोष सोनवणे, वय ३६ वर्षे, धंदा शेतो, रा.गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. गजानन संतोष सोनवणे, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा.गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ४. वैशाली सतीष महाले, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. हडपसर, पुणे. ५. छाया प्रफुल बोरसे, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुरत्त. ६. वत्सलाबाई फकीरा सोनवणे, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा.गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसाहक्क (सक्सेशन) प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. स्वप्निल र. सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत संतोष फकीरा सोनवणे यांचा दिनांक २७/०२/२०२५ रोजी सोहम हॉस्पीटल अॅन्ड मेडीकल फाउंडेशन प्रा.लि. नाशिक येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ६ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा, न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ हे मयत संतोष फकीरा सोनवणे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०७/११/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १५/१२/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:– २९६/२०२५.

अर्जदारः–१) निर्मला रामलाल महेर, वयः ५० वर्षे, धंदाः– शेती. २) मंगेश रामलाल परदेशी (महेर), वयः २७ वर्षे, धंदाः– नोकरी, वरील सर्व अर्जदार रा. नांदगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरूध्द //

गैरअर्जदारः–निरंक.

अर्जः– वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नागे रामलाल सुपड्डु महेर हे दिनांक १७/१०/२०२५ ला मौजे, नांदगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः– ०१/०१/२०२६).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल, त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ०६/११/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

स्थापना दि.–०३/०१/१९६४

# कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नड

**ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर, पिन- ४३११०३**

फोन नं. ०२४३५–२२१०४० Email-am kannad@msamb.com

| सभापती | उपसभापती | प्र सचिव |
|---|---|---|
| डॉ.श्री. राठोड मनोज माहारू | श्री. बोरसे जयेश काकासाहेब | श्री. कदम कुणाल रघुनाथ |

**कृषि उत्पन्न बाजार समिती, कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र.:२३४/२०२५–२६ — दिनांक : ०५/११/२०२५

## ई- निविदा सूचना क्रमांक. ०२ सन २०२५-२६ (ऑनलाईन)

Portal: https://mahatenders.gov.in

मा. सभापत्ती, कृषि उत्पन्न बाजार समिती कन्नड, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड अंतर्गत खालील कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून १इ–१ नमुन्यातील ई–निविदा (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम | अनामत रक्कम | टेंडर फॉर्म फिस |
|---|---|---|---|---|
| १. | कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नडचे उपबाजार पेठ देवगाव रंगारी येथे रोडलगत १९ शांपकम गोडाऊन बांधकाम करणे | रु. ४.२२.८५,७१३/– | ४,२२,८५७/– | ५०००/– |
| २. | कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड चे मुख्य मार्केट यार्डात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजना' अंतर्गत शेतकरी निवास बांधकाम करणे | रु.१.५७,९७,४३०/– | १,५७,९७४/– | ५०००/– |

वरील कामाची निविदा भरणेपूर्वी अहर्ता अटी, ई–निविदा प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक व सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०६/११/२०२५ पासून दिनांक १५/११/२०२५५ पर्यंत पाहता येईल व भरता येतील व सर्व निविदा बाजार समितीच्या कार्यकारी मंडळाच्या येण–या सभेत खुल्या करण्यात येतील. बाजार समितीने कोणतेही निविदा अथवा सर्व निविदा त्यासाठी कोणतेही कारण न देता नाकारण्याचा व निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा हक्क/अधिकार राखून ठेवलेला आहे.

| डॉ.श्री. राठोड मनोज माहारू | श्री. बोरसे जयेश काकासाहेब | श्री. कदम कुणाल रघुनाथ |
|---|---|---|
| सभापती | उपसभापती | प्र सचिव |

स्वाक्षरीत/– सचिव — स्वाक्षरीत/– सभापती

कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड

ता. कन्नड, जि. औरंगाबाद

## अग्रलेख...

# फटाके आणि हायड्रोजन बॉम्ब

बिहारमधील विधानसभा निवडणुकांचे रंगात आलेले राजकारण केवळ मतांची टक्केवारी, जाती-धर्मांची परंपरागत गणिते एवढ्या मर्यादित मुद्यांभोवती फिरणारे राहिलेले नाही. आता होत असलेली ही निवडणूक म्हणजे, भाजपाच्या राष्ट्रीय स्तरावरील राजनीतीला मिळणारा कौल असेल. काँग्रेस नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या निवडणूक राजनीतीचा बाजच वेगळा आहे. बिहारमधील निवडणुकांच्या तोंडावर त्यांनी उचलून धरलेल्या मतचोरीच्या मुद्याचा नवा अंक 'एच फाईल्स' या नावाने बुधवारी सादर करण्यात आला. हरयाणामध्ये २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत २५ लाख मतांची चोरी झाल्याचा व मतदार यादीत अनेक नावांची दुबार किंवा त्याहून अधिक वेळा नोंद झाल्याचा आरोप करून त्यास पुष्टी देणारे काही पुरावेही त्यांनी माध्यमांसमोर मांडले. हे सारे एक नियोजनबद्ध कारस्थान असल्याचा आरोप करून त्यांनी निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा नवा प्रयत्न केला. त्यांचा हा नवा कथित हायड्रोजन बॉम्ब सत्ताधारी भाजपाला आणि केंद्रीय निवडणूक आयोगाला जोरदार धक्का देणार, अशी जोरदार हवा त्यांच्या पत्रकार परिषदेआधी काँग्रेस व भाजपाविरोधी आघाडीने तयारही केली होती; पण या पक्षांचाच अपेक्षाभंग झाला. निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांच्या या आरोपांचे खंडन केले आहे.

मतदार यादीत दोष असेल तर काँग्रेसच्या बूथ स्तरावरील कार्यकर्त्यांनी त्यास वेळीच आक्षेप का घेतला नाही, निवडणुकीआधी प्रसिद्ध झालेल्या यादीबाबत एकदाही तक्रार किंवा आक्षेप नोंदविला नाही, अनेक वेळा मतदान करणाऱ्यांना रोखले नाही आणि मतदान केंद्रांतील त्रुटी दाखविल्या नाहीत, हा निवडणूक आयोगाचा खुलासा लोकशाही प्रक्रियेशी सुसंगत असाच आहे. राहुल गांधी यांनी माध्यमांसमोर कितीही आवेशांत कागदपत्रांचे गठ्ठे उघडले, मतदारांना समोर उभे करून मतचोरीच्या कहाण्या रचल्या, तरी ज्या लोकशाही यंत्रणेच्या कारभारास आव्हान देण्यासाठी न्यायालये हाच योग्य मार्ग ठरतो; तिकडे जाण्याची मात्र त्यांची तयारी नाही. आपण माध्यमांच्या साक्षीने देशासमोर जे काही उघड करीत आहोत, ते न्यायालयांस दिसत असल्याने न्यायालयाने याची दखल घ्यावी ही त्यांची अपेक्षा म्हणजे, लोकशाही यंत्रणांना आपल्या अपेक्षेनुसार वागविण्याचा व वाकविण्याचा प्रयत्न ठरू शकतो. राहुल गांधी यांना त्यांच्या आरोपांचे ठोस पुरावे घेऊन न्यायालयासमोर जावे लागेल. कारण लोकशाहीमध्ये तोच एक न्याय मिळविण्याचा न्याय्य मार्ग असतो. पण तसे होणार नसल्याने राहुल गांधींच्या कथित हायड्रोजन बॉम्बचा स्फोट तर होणे शक्य नाहीच; पण त्यांना अपेक्षित असलेला परिणामही साधता येणार नाही. हरयाणाच्या निवडणुकीतील गैरप्रकारांचे आरोप बिहार निवडणुकांच्या तोंडावर करण्यासाठी माध्यमांचा मंच वापरून बिहारी मतदारांच्या मनात निवडणूक यंत्रणा, सरकार, न्यायालये आदी लोकशाही व्यवस्थांविषयी संशयाचे ढग उभे करण्याचा आणि जनतेस संभ्रमित करून त्याचा तात्कालिक राजकीय फायदा घेण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. ही नीती बिहारमध्ये तेजस्वी यादव यांच्या निवडणूक नीतीपेक्षा वरचढ ठरेल आणि या निवडणुकीत प्रभावी ठरू पाहणाऱ्या तेजस्वी यादव यांच्या प्रतिमेहून राहुल गांधी यांची प्रतिमा उजळण्याच्या प्रयत्नापलीकडे या कथित हायड्रोजन बॉम्बचा परिणाम होईल, अशी शक्यता धूसरच आहे. लोकशाहीतील कोणत्याही यंत्रणांची कार्यपद्धती संशयातीत असली पाहिजे आणि त्यांच्या कामगिरीवर कोणतेही बोट दाखविले जाऊ नये ही रामराज्याची संकल्पना आहे. राहुल गांधी यांनी न्यायालयात न जाता या यंत्रणांवर जाहीर आरोपांचे सत्र अवलंबिले असल्याने, त्यातून तावूनसुलाखून निघण्याकरिता आयोगास अग्निपरीक्षा देणे भाग पडावे, हाच या राजकारणाचा बाज दिसतो.

बिहारच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाप्रणीत रालोआसमोर लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांनी मोठे आव्हान उभे केल्याची जोरदार हवा निर्माण करण्यात आली आहे. निवडणुकीच्या राजकारणात अशी रणनीती आखली जातेच. तेजस्वी यादव यांनीही प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन दिले आहे. 'बिहार का तेजस्वी प्रण' असे त्यांच्या आश्वासनाचे वर्णन केले जात आहे. मागच्या निवडणुकीतही त्यांनी दहा लाख रोजगारांची हमी दिली होती; पण हे रोजगार कोठून आणणार, याचा कोणताच ठोस आराखडा त्यांनी मांडला नाही. त्यामुळेच बेरोजगारीमुळे हतबल झालेल्या आणि बौद्धिक विकासाची आस असलेल्या युवक मतदारांना तेजस्वी यादव यांची ही घोषणा भुलवू शकली नाही. निवडणुकीआधी केल्या जाणाऱ्या अशा घोषणांतून पुढे येणाऱ्या काही प्रश्नांची उत्तरे तेजस्वी यादव यांच्याकडे नाहीत. या घोषणांचा राज्याच्या तिजोरीवर होणारा परिणाम कसा रोखणार याचा काहीच आराखडा त्यांच्याकडे नाही. त्यामुळे घोषणांच्या अंमलबजावणीबाबत जनतेच्या मनात विश्वास रुजविणे तेजस्वी यादव यांना सोपे नाही. एका बाजूला तेजस्वी यादव यांची आश्वासनांची खैरात, राहुल गांधी यांचा निवडणूक आयोगाविरुद्धचा संघर्ष आणि दुसरीकडे गेल्या दहा वर्षांच्या केंद्रातील सत्ताकाळात आणि नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कारकीर्दीत बिहारच्या जनतेमध्ये झालेल्या मानसिक परिवर्तनाची कसोटी या निवडणुकीत पुन्हा लागणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीतील भाजपाच्या विजयानंतर बुधवारी नवी दिल्लीत पक्षाच्या मुख्यालयाच्या प्रांगणात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आयोजित केलेल्या धन्यवाद बिहार मेळाव्यात पक्षाचे नेते आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयाचे नेमके विश्लेषण केले होते. तळागाळातील प्रत्येक माणसापर्यंत विकासाची फळे पोहोचून त्याच्या जगण्याला अर्थ प्राप्त करून देणे हा खरा विकास आहे, ही पक्षाची भावना मोदी यांनी त्या मेळाव्यात अधोरेखित केली होती. बिहारने ही भावना ओळखली, याचाही त्यांनी उल्लेख केला. बिहारचे राजकारण सामाजिक रचनेभोवती फिरत ठेवण्याचा भाजपेतर पक्षांच्या राजकारणाचा डाव या निवडणुकीत फसला होता. बिहार हे कर्तबगारांचे राज्य आहे. या राज्याने देशाला अनेक सनदी अधिकारी दिले. पोलिस सेवेत उल्लेखनीय काम करणारे अनेक अधिकारी बिहारमधूनच देशाच्या कानाकोपऱ्यात गेले. साहजिकच या राज्यातील प्रत्येक तरुणाच्या डोळ्यात उत्कर्षाची स्वप्ने कधीपासूनच रुजलेली आहेत; पण ती स्वप्ने साकारण्याच्या साधनांचा स्थानिक पातळीवर अभाव हे बौद्धिक विकासासमोरील मोठे आव्हान आहे. प्रशांत किशोर सारख्या नेत्याने आपल्या पक्षाचा प्रचारही या जाणिवेभोवती केंद्रीय ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. भाजपाने समस्येच्या मुळाशी जाण्याचा निर्धार केला होता आणि बिहारमधील तरुणाला त्याच्या क्षमतांचा विकास घडविता येईल अशा शैक्षणिक सुविधा राज्यातच उपलब्ध करून देण्याची ग्वाहीदेखील दिली होती.

निवडणुकीआधीचे आडाखे आणि मतदारांची मानसिकता, मतदानाआधीची गणिते यांमध्ये खूप अंतर असते. बिहारच्या राजकारणाची गणिते राज्यातील सुमारे १४ टक्के यादव, सुमारे १८ टक्के मुस्लिम, ३० टक्के मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमाती, अन्य समाजाच्या मतपेट्यांवर केंद्रित होत असत. भाजपा आघाडीने या राजकारणास पूर्णविराम देऊन केवळ विकासाच्याच भाषेवर भर दिला. सर्व वयोगटांतील आणि समाजघटकांतील महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महिला केंद्रित विकास योजनांवर दिलेला भर आणि त्याच्या जोडीला नितीश कुमार यांच्या सरकारने आपल्या सत्ताकाळात विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या शैक्षणिक योजना या मुद्यांनी जातिपातीच्या या प्रस्थापित राजकारणावर मात केली आहे. महिला हा भाजपाचा 'सायलेंट व्होटर' आहे, हे बिहारमधील महिलांनी भाजपाला दिलेल्या भरघोस पाठिंब्यावरून याआधीही सिद्ध झाले आहे. आता या निवडणुकीआधी बिहारमध्ये महिलांसाठी जाहीर केलेल्या पॅकेजमुळे यात भरच पडेल, असे चित्र विरोधकांनीही ओळखले आहे. बिहारच्या विधानसभा निवडणुकीतून उमटणारे राष्ट्रीय राजकारणाचे रंग राहुल गांधींचे भविष्य ठरविणार आहेत, यात मात्र शंका नाही.

## प्रासंगिक

**परिमल नळकांडे**

# वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्।

समाजाला ऐक्याच्या सूत्रात बांधणारे व राष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा म्हणून भारतीयांच्या हृदयी असलेले 'माते तुला वंदन असो' असा साधा-सरळ अर्थ असलेले शब्द ज्याला हिमालयाची उत्तुंगता, गंगेची निर्मलता लागू पडते असे 'वंदे मातरम्' हे गीत. अत्यंत सरल शब्द आणि तरल भावना असलेल्या या गीतांच्या शब्दात मधुरता जरी असली, तरी या शब्दांनी देवीदेवतांच्या हाती असलेल्या शत्रुसंहारक अस्त्रांचे रूप धारण केले. राष्ट्राच्या, चळवळीच्या जडणघडणीत अनेक व्यक्तींचे, संघटनांचे कर्तृत्व व कामगिरीचे मोठे योगदान राहिले आहे. केवळ या एका गीताने किंबहुना त्यातील किमान दोन शब्दांनी राष्ट्राच्या इतिहासाला वळण देण्याचे उदाहरण अपवादात्मकच असावे. ते दोन शब्द म्हणजे वंदे मातरम्! हे एक आश्चर्यच म्हणावं लागेल. क्रांती आणि अहिंसा या दोन्ही विचारांचं एकत्रीकरण असलेले हे शब्द व दोन्ही विचारधारा ज्या गीतासमोर नतमस्तक होतात ते हे गीत प्रचंड लोकप्रिय ठरलं आहे.

बंकिमचंद्र चट्टोपाध्य यांच्या अलौकिक प्रतिभेतून १८७५ मध्ये 'वंदे मातरम्' हे गीत निर्माण झाले. बंकिमचंद्रांनी आपल्या प्राचीन परंपरेचे भान ठेवत केलेले राष्ट्र चिंतन; या चिंतनातून समृद्ध देशाचे पाहिलेले स्वप्न आणि मातृभूमीच्या सर्व पुत्रांमध्ये एकत्वाची भावना ठेवून समर्पणाचा केलेला निर्धार ही या गीताची वैशिष्ट्ये. त्यामुळेच वंदे मातरम् हे चिरंतर टिकणारी साहित्यकृती आहे. या गीताच्या बळावरच अनेक सर्वसामान्यांनी स्वतःला स्वातंत्र्यलढ्यात झोकून दिले, अनेकांनी हौतात्म्य पत्करले, भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या यज्ञात स्वतःला समिधा म्हणून समर्पित केले म्हणून हे गीत केवळ साहित्यकृती न राहता त्याहीपेक्षा सर्वोच्च स्थानावर आसनस्थ झालेला दैवी मंत्र ठरला आहे.

आपली संस्कृती मातृप्रधान आहे. देशाला मातृभूमी असे संबोधणे असा आदर्श अथर्वऋषींनी अथर्ववेदामधील पृथ्वीसूक्तात घालून दिला होता. विस्मृतीत गेलेली ही कल्पना १८५० च्या सुमारास बंगाली प्रतिभावंत कवी व संपादक असलेल्या ईश्वरचंद्र गुप्त यांनी 'जननी भारत भूमी आर केन थाक तुम्ही' या कवितेतून पुनरुज्जीवित केली. त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांचे शिष्य बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या अलौकिक प्रतिभेतून वंदे मातरम्च्या रूपाने अतीव सुंदर असा आविष्कार प्रकट झाला. बंकिमचंद्रांना बंगालमध्ये 'ऋषिबंकिम' असे संबोधले जाते. स्वतः बंकिमचंद्र ऋषितुल्य असल्यामुळे त्यांनी रचना केलेले 'वंदे मातरम्' या शब्दांना वेदमंत्रांचे स्थान मिळाले आहे. दरवर्षीप्रमाणे बंकिमचंद्र आपल्या जन्मगावी नौहाटी कांटलापाडा येथे १८७५ च्या आश्विन महिन्यात नवरात्र उत्सवानिमित्ताने गेले. अष्टमीच्या उत्तररात्री मां दुर्गेची पूजा करीत असताना त्या मूर्तीत त्यांना भारतमाता दिसल्याचा भास झाला आणि



राक्षस महिषासुराच्या जागी इंग्रज दिसू लागले. त्याचवेळी त्यांनी 'आमार दुर्गोत्सव' हा लेख नवमीच्या पहाटेला लिहिला; तेच 'वंदे मातरम्'चे प्रथम लिखित गद्य स्वरूप. या लेखानंतर अवघ्या एका महिन्याने कार्तिक शुद्ध नवमी ७ नोव्हेंबर १८७५ या दिवशी नौहाटी येथे बंकिमचंद्रांनी एक हाती 'वंदे मातरम्' संस्कृत भाषेमध्ये पद्य स्वरूपात लिहून पूर्ण केले. पुढे सात वर्षांनी १८८२ मध्ये 'आनंदमठ' कादंबरीत हे गीत त्यांनी कथानकात गुंफले. 'गीतांजली'कार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेचे अधिवेशनात 'वंदे मातरम्' सादर करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. चेतनेचा आवाज व राष्ट्राचा आत्मा वंदे मातरम् बनले. महर्षी अरबिंदो, मॅडम भिकाजी कामा, कवी सुब्रमण्यम भारती, लाला हरदयाल, लाला लजपत राय या महापुरुषांनी त्यांची वर्तमानपत्रे व मासिकांच्या नावामध्ये 'वंदे मातरम्'चा समावेश केला. महात्मा गांधीसुद्धा अनेक वर्षे आपल्या पत्राचा शेवट 'वंदे मातरम्'ने करीत असत.

वंगभंग चळवळीच्या दरम्यान कलकत्ता येथील टाऊन हॉलमध्ये २० ऑगस्ट १९०५ रोजी सभेत अचानक कोणीतरी 'वंदे मातरम्' अशी घोषणा केली आणि या दोन शब्दांच्या सामूहिक गर्जनेने अवघा आसमंत दुमदुमून गेला. या प्रसंगापासून हे गीत स्वातंत्र्यलढ्याचे युद्धघोष बनले व इंग्रज सरकारला धडकी भाडवणारे शब्दरूपी अस्त्र बनले. बंकिमचंद्र 'वंदे भारत' असे न लिहिता 'वंदे मातरम' असे लिहीत. कारण भारतीय संस्कृतीच्या राष्ट्रवादाचे सूत्र मातृ पूजनात आहे. आपल्या जन्मभूमीचे दृश्यात्मक दर्शन व्हावे, असे सामर्थ्य या शब्दात आहे. भारतभूमी माझी मातृभूमी आहे; तिच्यासाठी मी स्वतः सर्वस्व अर्पिल, अशी भावना 'वंदे मातरम्'च्या उच्चारणातूनच प्रत्येकाच्या मनात निर्माण होते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर २४ जानेवारी १९५० रोजी झालेल्या घटना समितीच्या शेवटच्या सभेत 'जन गण मन'ला राष्ट्रगीत म्हणून तर 'वंदे मातरम्'ला राष्ट्रीय गीताचा दर्जा देण्यात आला. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रगीत व राष्ट्रीय गीत यांना समान सन्मान दिला जावा, असे यावेळी सांगितले. समाजाच्या राष्ट्रीय चेतनेसाठी 'स्व'च्या आधारावर राष्ट्र उभारणीच्या कार्यात समाजाला सक्रिय करण्यासाठी 'वंदे मातरम्' या पवित्र गीताचे पठन कुटुंब प्रबोधनाचा भाग व्हावे त्यातून परम वैभवी राष्ट्र निर्मितीच्या दिशेने अग्रेसित होता येईल.?

संस्कारक्षम पिढी घडविण्यासाठी तसेच मातृभूमीच्या प्रति समर्पण भाव जागृत करून तो चिरंतन तेवत राहावा याकरिता बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी वंदे मातरम् ही जी अजरामर दैवी कलाकृतीचा मंत्र रचला त्याचे पठन व पारायणे प्रत्येक भारतीयाच्या कुटुंबात झाले तर विश्वव्यापी, विश्वगुरू 'भारत' याची देही याची डोळा आपण निश्चितच पाहू शकू, याचा सार्थ अभिमान मी भारतीय म्हणून प्रत्येकाला असेल. 'वंदे मातरम' हे भारत ह्या विश्वव्यापी राष्ट्राचे आत्मगीत असून त्याची प्रेरणा सर्वांना मिळत राहो व राष्ट्रीय चेतना व राष्ट्रनिर्मितीच्या या पवित्र वेळी या महान दैवी मंत्राच्या भावनेचा अंगीकार भारतीयांमध्ये होवो. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला महान उद्देश देणाऱ्या व मातृभूमीला सुजलाम् सुफलाम् बनण्यासाठी प्रेरणास्रोत बनलेला हा मंत्र ज्याची 'नमस्ते सदा वसले मातृभूमे' ही पुढील आवृत्ती बनली. ज्यातून राष्ट्र प्रथम हा ध्यास घेणारे व्यक्तित्व निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून अविरत प्रयत्न होत आहेत. भारत माता ही नेतृत्वाची भूमी आहे. कर्तृत्वाची, गुरूंची भूमी आहे. अखिल विश्वाचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेल्या या भारतभूमीचे मोठेपण निर्विवादपणे जगाने आज मान्य केले आहे; ते एकाच कारणाने, ते म्हणजे या भारतभूमीला आम्ही माता मानतो. तिला आम्ही सदैव नतमस्तक आहोत. म्हणूनच आज वंदे मातरम् या गीताचे १५० वर्षे पूर्ण होत असताना हे गीतही आपल्या ओठांवर सहज येते...

वेदमंत्राहून आम्हां वंद्य, वंदे मातरम्।

९८५०७८९५७४

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# इष्टाचा स्वीकार हीच श्रद्धा

आपण खरोखरच देवाची पूजा करतोय की, देवाच्या नावाने अधर्माचे तांडव करतोय, असा प्रश्न पडण्यासारखी परिस्थिती आजकालही उद्भवते. उदाहरण म्हणजे- नवस फेडण्याच्या नावाखाली नवजात बालकांना वेदना देण्याची प्रथा आजही अनेक ठिकाणी आहे. त्यातली एक प्रथा म्हणजे- देवाच्या कृपेची परतफेड म्हणून आई-वडील बाळाला थंड पाण्यात क्षणभर बुडवतात. त्याप्रसंगी भोवतालचे लोक टाळ्या वाजवतात, आरती म्हणतात आणि त्या लहान जिवाचे थरथरणारे शरीर त्या साऱ्यांच्या श्रद्धेसाठी एक माध्यम ठरते. अशी प्रथा कोणे एके काळी देवाला प्रसन्न करण्याच्या असोशीतून सुरू झाली असेलही. त्यावेळी आणि त्यानंतरदेखील बरेच काही घडले. त्या साऱ्यांचा उच्चार करण्याची आता गरज नाही. कारण ते दुरुस्त होऊ शकत नाही. गतकाळात काय झाले, याची उजळणी करण्यापेक्षा वर्तमान आणि भविष्य दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आपल्या समाजाने अनेक अनिष्ट प्रथा-परंपरा मागे सोडल्या. म्हणूनच आज भारतीयांचा बोलबाला जगभर आहे. श्रद्धा आणि संस्कृती न सोडताही हा समाज जगात नाव कमावता झाला, याचे कारण या समाजातील सामूहिक विवेकात दडलेले आहे. मात्र, आजच्या काळातही नदीत सोडलेले बाळ देवाच्या कृपेने वाचले तर देव पावतो आणि नशिबाने अपघात झाला तर देवाची मर्जी, असा प्रकार होत असेल तर ते धक्कादायक आणि धोकादायकही आहे. ईश्वरावरील श्रद्धा इतकी क्रूर आणि अमानुष असू शकत नाही. ईश्वराला फक्त माणुसकी हवी असते. माणसांचे आपसातले प्रेम हवे असते. श्रद्धेच्या नावाखाली त्याला कोणत्याही प्राणिमात्राला त्रास दिलेला चालत नाही. तरीही हे असे घडत असते तेव्हा धक्का बसतो. श्रद्धाळूंना देव पावतो, असे आपण



म्हणतो तेव्हा ईश्वरी शक्तीवर विश्वास ठेवून आपले कर्म करीत असलेल्यांचे अंतिमतः कल्याण होते, असाच त्याचा साधा अर्थ असतो. पण, श्रद्धेला अविवेकाची काजळी चढते तेव्हा त्यातून अंधश्रद्धेचा जन्म होतो आणि असे अघोरी काही तरी घडते आणि अशा श्रद्धाभावावरच प्रश्नचिन्हे उपस्थित केली जाऊ लागतात. देवावरचा विश्वास, व्रत, उपवास आणि नवस यांमुळे अनेकांना मानसिक बळ मिळते हे खरे आहे. जीवनातील संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य मिळते हेही खरे. पण, नवस फेडण्याच्या नावाखाली असे काही तरी अघोरी कृत्य होत असेल तर देवही त्यांना माफ करणार नाही. नवजात बालकांचा नवस फेडण्यासाठी केले जाणारे असले अघोरी प्रकार हे त्या कुटुंबासह साऱ्या समाजासाठी लांच्छनास्पद आहेत.

मध्यप्रदेशातील भैसदेही (जिल्हा बैतुल) येथे नवस फेडण्याच्या नावाखाली बालकांना नदीच्या पाण्यात सोडण्याची प्रथा आजही अस्तित्वात आहे. देवावर विश्वास ठेवणे आणि देवाच्या नावाने निरागसाच्या जिवाशी खेळणे यात फरक आहे. दुर्दैवाने अंधश्रद्ध व्यक्तींना यातील फरक कळत नाही. श्रद्धा माणसाला उन्नत करते तर अंधश्रद्धा अधःपतनाकडे नेते, हे अशा लोकांना समजावून सांगण्याची गरज आहे. नवस फेडण्याच्या नावाखाली बालकांना पाण्यात सोडण्यात कसलीही श्रद्धा नाही; ती मानवी मनाची भीती आणि पूर्णपणे अंधविश्वासच होय. काही परंपरा काळानुरूप बदलण्याची गरज असते. आधुनिक भारताला श्रद्धा हवी आहेच. डोळस श्रद्धा ही भारतीय समाजाची ओळख आहे, पण अंधश्रद्धा हा आपल्या समाजासाठी ठसठसता व्रण आहे, हेही तेवढेच खरे. नवस कोण्या एका जाती-धर्मातच केला जातो असे नाही. अडचणीत आलेली प्रत्येक व्यक्तू देवाचा धावा करते आणि इच्छा पूर्ण झाल्यावर त्याची परतफेडही करते, म्हणजे नवस फेडते. सश्रद्ध असलेल्या हिंदू समाजाची प्रतिमा प्रगतिशील आणि विज्ञानवादी समाज अशी आहे. अशा समाजाला बदनाम करण्यासाठी काही लोक नेहमीच टपलेले असतात. त्यामुळे असे प्रकार आपल्या भोवताली कुठेही घडत असतील, नजरेस येत असतील तर ते थांबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. हिंदू समाजातील जाणत्या जनांची ही जबाबदारी आहे. आपला समाज प्रगत झाला याचा अर्थ प्रत्येकाच्या घरी श्रीमंती आली असा होत नसतो. समाज तेव्हाच खऱ्या अर्थाने प्रगत होतो, जेव्हा तो अनिष्टाला मागे सोडून इष्टाचा स्वीकार करतो आणि इष्टाचा स्वीकार हीच खरी ईश्वरी आराधना आणि हीच खरी श्रद्धा होय.

९८८१९०३७६५


## विशेष

**मोरेश्वर बडगे**

# विरोधी पक्ष लढूच शकत नाहीत!

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचं बिगुल वाजलं आहे. २ डिसेंबर रोजी पहिल्या टप्प्यात नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुका होणार आहेत. मतदार याद्या सदोष असल्याचे कारण पुढे करून निवडणुका पुढे ढकलू मागणाऱ्या विरोधी पक्षांना हा तडाखा आहे. त्यांना आता लढावेच लागेल; पण लढणार कसे? संविधानाचे 'लाल पुस्तक' दाखवून राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीत जनतेला भुलवले. त्यामुळे महाराष्ट्रात भाजपाला खड्डा पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नितीशकुमार, चंद्राबाबू नायडू यांची मदत घ्यावी लागली. विधानसभा निवडणुकीत कुठलाही नॅरेटिव्ह नव्हता. त्यामुळे विरोधकांनी मार खाल्ला. आता त्यांनी 'मत चोरी' नावाचा नवा मुद्दा शोधला आहे. मतदार याद्या सदोष आहेत, असे सांगून त्यांनी निवडणुकाच पुढे ढकला, याद्या दुरुस्त करून मग निवडणुका घ्या, असा धोशा चालवला आहे. लोकसभेत जिंकले तेव्हा विरोधकांना मतदार यादीतले दोष दिसले नाहीत. मुळात ते निवडणुकीला घाबरले आहेत. जनता आपल्याला जवळ करणार नाही, ही भीती त्यांना सतावते आहे. त्यातून हे नखरे सुरू झाले आहेत. पण निवडणुका होणार. विरोधकांना त्या लढाव्याच लागणार. नाही म्हणून सांगणार कोणाला? राजकीय पक्ष निवडणुकांसाठीच असतो. निवडणुकाच लढायच्या नाहीत म्हटले तर पक्षच संपतो. तुम्ही पाहाल. राज ठाकरेंपासून उद्धव ठाकरेंपर्यंत सारे लढतील. लढले नाही तर त्यांचेच लोक त्यांना सोडून बंडखोर म्हणून लढतील. शेवटी प्रत्येकाला आपापले राजकारण आहे.

शरद पवार कित्येक वर्षे सत्तेत होते. काही केले नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न त्यांना सोडवावा, असे वाटले नाही. मतदार याद्या सुधाराव्या, असे वाटले नाही. मात्र सत्ता गेली की मागायला हे मोकळे. मत चोरी विरोधी पक्षही रोखू शकतो. त्यासाठी निवडणूक आयोगाची गरज नाही. कोर्टात जायची गरज नाही. बुथवर चाणाक्ष पोलिंग एजंट ठेवले तर मत चोरी तिथल्या तिथे पकडता येते; पण हे करायची विरोधकांची तयारी नाही. त्यांना राजकारण करायचे आहे. प्रहारचे नेते बच्चू कडू चार वेळा आमदार होते. त्या काळात त्यांना शेतकरी आठवला नाही. आता रिकामपण आल्यावर शेतकऱ्यांचे आंदोलन चालवत आहेत. उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांचीही अशीच अवस्था आहे. मुंबईमध्ये उद्धव यांचे देऊळ पाण्यात आहे. २५ वर्षे एकहाती राहिलेली मुंबई महापालिका हातची जाणार या जाणिवेने उद्धव अस्वस्थ आहेत. त्या मानसिकतेतूनच त्यांनी २० वर्षांपूर्वी वेगळे झालेल्या भावाला सोबत घेतले. तरीही माहोल सुधारत नाही हे पाहून त्यांनी लोकांमध्ये संभ्रमावस्था पसरवणे सुरू केले आहे. निवडणूक



आयोगासारख्या संवैधानिक संस्थेविषयी लोकांमध्ये संशय निर्माण केला जात आहे. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनला, असे ते म्हणतात. त्या जोशात मतदार याद्यांची चिरफाड करताना ठाकरे बंधू थकत नाहीत. दुबार मतदारांचा विषय मांडताना विरोधकांनी केवळ मराठी माणसांचीच नावं सांगितली. हिंदू-मराठी माणसंच दोन-तीन वेळा नोंदणी करून भाजपाला जिंकवतात, असे त्यांना सुचवायचे आहे का? मतदार याद्यांमध्ये गफलत नाही, असे भाजपाने कधीही म्हटलेले नाही. पण विरोधकांनी लपवली ती मुस्लिम दुबार मतदारांची नावं भाजपा नेते आशिष शेलार यांनी उजेडात आणली. राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार १२४३ मतांनी जिंकले. त्यांच्या मतदारसंघात दुबार मुसलमान मतदारांची संख्या ५५३२ आहे. नाना पटोले फक्त २०८ मतांनी जिंकले. तेथे मुसलमानांची दुबार मतं ४७७ आहेत. ही यादी ठाकरेंना का दिसली नाही? भोईर, पाटीलच का दिसले? मतदार याद्या सदोष आहे असे म्हणता, पण याच याद्यांच्या जोरावर महाराष्ट्र विकास आघाडीने लोकसभेच्या ३१ जागा जिंकल्या आहेत. तेव्हा तर कोणी ओरडा केला नाही. लोकसभेच्या वेळी होत्या त्याच मतदार याद्यांवर विधानसभा निवडणूक झाली. आपण जिंकलो तर सारे बरोबर. हरलो तर मतचोर हा विरोधकांचा शुद्ध कांगावा आहे. विरोधकांनी आखलेले हे 'फेक नॅरेटिव्ह' आहे. शेलारमामांनी ठाकरेंना बरोब्बर उघडे पाडले. मतदार याद्या निर्दोष असल्या पाहिजेत, असे साऱ्यांनाच वाटते. त्या आधार कार्डशी, बँक खात्याशी जोडल्या तरच ते होऊ शकते. पण तशी कोणाची इच्छा आहे? त्या ऐवजी मोर्चा काढणेच विरोधकांना आवडते.

मतदार याद्यांमधील घोळाकडे लक्ष वेधण्यासाठी ठाकरे बंधूंनी मुंबईत मोर्चा काढला. या मोर्चाला 'सत्याचा मोर्चा' असे नाव दिले गेले. सत्य शोधावं लागणाऱ्या या मोर्चात मुलूखमैदान तोफ म्हणून ओळखले जाणारे उबाठाचे खासदार संजय राऊत नव्हते. 'गंभीर आजार झाल्याने दोन महिने आपण सार्वजनिक जीवनात दिसणार नाही' असे संजय राऊत यांनी मागेच जाहीर केले होते. मात्र पूर्ण मोर्चात त्यांचे नाव घेण्याची इच्छाही कोणाला झाली नाही हे नवलच. सकाळी नित्यनियमाने सत्ताधाऱ्यांविरोधात राऊत सडकून टीका करत. गेली सहा वर्षे ते ही गोष्ट नित्यनियमाने करत आले आहेत. सत्ताधारी 'सकाळचा भोंगा' म्हणून त्यांची टिंगल उडवतात तो भाग वेगळा. पण हा भोंगा सध्या बंद आहे. नियती कोणाला चुकली? असे म्हटले जाते तेच खरे. मात्र त्यांची दखल सर्वप्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घ्यावी हेही नवलच. 'तुमच्या तब्येतीत सुधारणा होवो यासाठी मी प्रार्थना करतो' असे ट्विट मोदींनी केले. दैनिकाचा जाहिरात व्यवस्थापक, वार्ताहर, पुढे कार्यकारी संपादक, नंतर शिवसेनेचे राज्यसभा सदस्य या विविध रूपात राऊतांची ओळख द्यावी लागेल. बाळासाहेब ठाकरे यांच्या जवळचे ते होते. आताही उद्धव ठाकरे यांचा चेहरा म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले जाते. चांगल्या आणि वाईट अर्थाने त्यांनी शिवसेनेला सदा चर्चेत ठेवले. असा मोहरा निवडणुकांच्या ऐन रणधुमाळीत मैदानात नाही, याचा उबाठाला नक्कीच फटका बसणार आहे. राऊत यांना नक्की काय झाले हे अजून बाहेर आलेले नाही. मात्र, त्यांची जागा कोण घेणार याची महाराष्ट्राला उत्सुकता आहे. आंदोलनाचा विषय येतो तेव्हा एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. मुळात विरोधी पक्षच उरला नाही. आंदोलन करणार कोण? जनतेची लढाई लढणे हा मूळ धर्म विरोधी पक्ष विसरले. आताही आंदोलनं होतात; पण ती टीव्हीवरच्या कॅमेऱ्यापुरती. कॅमेरे बंद झाला की आंदोलन संपते. पूर्वी जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर आदी नेते लाठ्या खात रस्त्यावर आडवे होत. आताच्या हायफाय आंदोलकांना साधेही खरचटत नाही. पण म्हणून आंदोलनं संपली अशातला भाग नाही. आंदोलनं होतात. विरोधी पक्ष त्यात उतरतच नाही. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी तब्बल तीन वर्षे आंदोलन केले. पण विरोधी पक्षाने बघ्याचीच भूमिका घेतली. बच्चू कडू यांच्या शेतकऱ्यांच्या ताज्या आंदोलनात विरोधकांनी झोकून देणे अपेक्षित होते, पण विरोधी पक्ष अलिप्त राहिले. त्यामुळे अपेक्षित रिझल्ट मिळत नाहीत. मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी निघालेला जीआर फुसका निघाला आणि कडू यांच्या हाती कर्जमाफीचे गाजर आले. अण्णा हजारे यांच्या लोकपाल आंदोलनात भाजपा पूर्ण ताकदीने उतरला होता. लोकचळवळ उभी करण्याकरिता प्रचंड मेहनत करावी लागते. तसली आंदोलन हल्ली दुर्मिळ झाली आहेत.

९८२२२६२७३५

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-३९

शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५

### करी बांधु या पवित्र कंकण

करी बांधु या पवित्र कंकण ॥धृ.॥

इतिहासाच्या पानोपानी पूर्व दिव्य ते बसले लपुनी
रम्य भविष्याची त्यामधुनी भव्य मंदिरे पुनश्च उभवुन ॥१॥

निजरुधिराची अर्घ्य अर्जुन ज्यांनी केले स्वराष्ट्रपूजन
कृतज्ञतेने तयांस वंदुन कर्तव्याचे करू जागरण ॥२॥

स्वार्थाचे ओलांडुन कुंपण व्यक्तित्वाचा कोषहि फोडुन
विसरुन अवघे अपुले मीपण विराट साक्षात्कार जागवुन ॥३॥

जो हिंदू तो अवघा माझा, घोष एक हा फिरून गर्जा
मुक्तिमार्ग हा एकच समजा, अन् सर्वांना द्या समजावुन ॥४॥

ध्वजराजाला साक्ष ठेवुनी आज बोलु या निश्चयवाणी
शुभसंकल्पा हीच पर्वणी राहिल निष्ठा उरी चिरंतन ॥५॥

## वन विभागाला जागे करण्याची गरज

केंद्र सरकार जनतेच्या हितासाठी कटिबद्ध आहे. मात्र राज्यातील वाढते राजकारण सामान्य माणसाला विचार करायला लावणारे आहे. शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यात सध्या ठिकठिकाणी बिबट्या हा वन्यप्राणी आढळून येतो आहे. जिल्हयतील खेड, शिरुर आदी तालुक्यात बिबट्यांनी काही शेतकऱ्यांवर हल्ला केल्याचीही जोरदार चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे ''कुत्रे कमी आणि बिबट जास्त'' अशी टीकाही अनेकांकडून होत आहे. वनविभाग सतर्क असून यासाठी पुरेपुर प्रयत्न सुरू आहेत. मात्र या बाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे.



अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये गावाबाहेर असल्याने धोका संभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. परराज्यातून बिबटे राज्यात येत नाही ना, असा प्रश्नही मनात येतो. आजही ग्रामीण भागात, शेतशिवारात वन्यप्राण्यांचा मोठा हैदोस पाहायला मिळतो आहे. रानडुक्कर, रोही, माकडे यांच्यामुळे शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. शेतात अनेकदा शेतकऱ्यांवरही हल्ले होतात. माणसाचे जीवन एवढे स्वस्त झाले का? मंत्रिमहोदय आणि वनविभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. मानवी वस्तीमध्ये राहून प्रामाणिकपणे जगणारे पाळीव कुत्रे यांची संख्या कमी होणार नाहीत. त्यांच्यावरही बिबट्यांचे हल्ले होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. तातडीने सापळे रचून खुलेआम फिरणाऱ्या बिबट्यांचा बंदोबस्त करावा,

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

## वाचक पत्रे

## पालिका निवडणुकीचा उत्सव प्रारंभ

नगर पालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. शहरात राजकीय चर्चा, उमेदवारांची धावपळ, कार्यकर्त्यांची लगबग, पोस्टर-बॅनरची गर्दी आणि सोशल मीडियावर सुरू झालेले प्रचारयुद्ध या सर्वांमुळे आता वातावरणात एक वेगळाच 'उत्सव' जाणवू लागला आहे. होय, हा उत्सव आहे लोकशाहीचा, जनतेच्या सत्ताधिकाराचा आणि नागरी जबाबदारीचा! नगर पालिका निवडणुका म्हणजे केवळ सत्तेचा बदल नाही, तर शहराच्या भविष्याची दिशा ठरवणारा निर्णायक टप्पा आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, नाल्या, उद्याने, बाजारपेठा ही केवळ सेवा नाहीत; हीच आपल्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाची गती आहेत. त्यामुळे मतदारांची निवड, त्यांचा विचार आणि निर्णय या सर्वांची किंमत प्रचंड आहे. आजची निवडणूक जनतेसाठी एक आरसा आहे. या आरशात उमेदवारांचे वचन, कामगिरी, प्रामाणिकता आणि जनतेशी असलेला संवाद स्पष्टपणे दिसतो. गेल्या पाच वर्षांत कोण खरंच जनतेसोबत उभा राहिला, कोण फक्त निवडणुकीच्या वेळीच दिसतो आणि कोणी खऱ्या अर्थाने विकासाला दिशा दिली हे सर्व मतदार ओळखू शकतात. आजच्या राजकीय वातावरणात प्रचाराचे माध्यम बदलले आहे. एकेकाळी घराघरापर्यंत जाऊन घेतलेला संवाद आता सोशल मीडियावरच्या पोस्ट आणि व्हिडीओंमध्ये परिवर्तित झाला आहे. परंतु जनतेच्या मनात पोहोचणारी गोष्ट अजूनही तीच आहे प्रामाणिकपणा आणि कामाची नोंद. या बळावरच उमेदवार निवडून येतील, हे लक्षात असले पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे- तहसीलदार बोथीकर

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकाची आदर्श आचारसंहिता लागू झाली असून सर्वांनी आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांनी केले. शुक्रवारी पूर्णा तहसील कार्यालयात दुपारी निवडणुकीच्या अनुषंगाने माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहाय्यक निर्वाचन अधिकारी प्रशांत थारकर नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे आदी उपस्थित होते यांप्रसंगी निर्वाचन अधिकारी तथा तहसीलदार माधवराव बोथीकर यांनी पूर्णा नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक माहिती पत्रकारांना सांगितली.

पूर्णा नगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ११ प्रभाग राहणार असून यातून २३ सदस्य निवडले जाणार आहे तर नगराध्यक्ष पदाची निवडणूक थेट जनतेतून केली जाणार आहे या निवडणुकीसाठी एकूण ३३ हजार ७७६ मतदार असून यामध्ये १६६८५ पुरुष तर १७ हजार ९१ महिला मतदार आहेत. शहरात एकूण निवडणुकीसाठी ३८ बूथ निर्माण करण्यात आले आहे तर चार झोनल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच आचार संहिता पथक प्रमुख म्हणून पूर्णा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नारायण मिसाळ यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार बोथीकर यांनी सांगितले.

### शेतकरी कुटुंबाच्या दुःखात भाजपा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव भरोसे यांची संवेदनशील साथ - तातडीची मदत, शासनस्तरावर आणखी सहाय्याचे आश्वासन

**परभणी-** येथे घडलेली एक हृदय पिळवटून टाकणारी घटना पुन्हा एकदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या समस्यांकडे समाजाचे लक्ष वेधते आहे. या गावातील शेतकरी स्वर्गीय गिरमाजी सखारामजी लोखंडे यांनी अत्यंत आर्थिक अडचणींना व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

ही घटना समजताच भाजप परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजीराव भरोसे यांनी तात्काळ गावाला भेट देऊन शोकाकुल कुटुंबाचे सांत्वन केले. त्यांनी शेतकरी स्व. गिरमाजी लोखंडे यांच्या कुटुंबाला ₹२५,०००/- ची तात्पुरती आर्थिक मदत सुपूर्त केली. त्यांच्या सोबत भाजपा कार्यकर्त्यांनीही उपस्थित राहून कुटुंबीयांना धीर दिला.श्री. भरोसे यांनी या प्रसंगी बोलताना सांगितले की, ''शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांच्या संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभं राहणं हेच खरं समाजकारण आहे.'' त्यांनी आश्वासन दिलं की पुढील काळात शासनस्तरावरून आणि पक्षस्तरावरूनही शक्य ती सर्व मदत कुटुंबाला मिळवून दिली जाईल. शिवाजी भरोसे यांनी शासनाकडे या प्रकरणाची दखल घेऊन शेतकरी कुटुंबाला शासनाच्या सर्व योजना, मदत आणि विमा लाभ मिळावेत यासाठी प्रयत्न करण्याचं आश्वासन दिलं आहे. त्यांनी सांगितलं की, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शेती विषयक योजनांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर दिला जाईल.

### संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा द्या : सकल मराठा समाजाची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांना जीवे मारण्याचा कट रचण्यात आल्याची माहिती माध्यमातून पुढे येत आहे. पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा पुरविण्यात यावी, अशी येथील सकल मराठा समाजाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

सकल मराठा समाजाचे किशोर रणेर, बापू कोल्हे, श्रीकांत भोसले, डॉ. विजय बोंडे, किरण शिंदे, बालाजी शिंदे आदींनी आज शुक्रवार ०७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना आपल्या मागण्या संदर्भात एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, मनोज जरांगे पाटील हे न्याय, समानता आणि हक्क यासाठी असलेल्या चळवळीचा आवाज आहेत, त्यांच्यावरील कोणताही कट, कोणतीही योजना आणि कुठलेही षडयंत्र आम्ही यशस्वी होऊ देणार नाही, त्यांच्या मागे समाज म्हणून जनतेचा महासागर उभा आहे, त्यामुळे त्यांच्यावरील जीवे मारण्याच्या कटाची एसआयटी चौकशी करावी, मनोज जरांगे पाटील यांना झेड प्लस सुरक्षा पुरवावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली.

### भरोसे यांनी केली मदत

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाचे परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी मौजे पोरजवळा येथे आत्महत्या केलेल्या स्व. गिरमाजी लोखंडे यांच्या कुटूंबियांना तातडीची आर्थिक मदत केली. पोरजवळा येथील गिरमाजी लोखंडे या ४५ वर्षीय शेतकऱ्याने नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून पिक फवारणीचे औषध पिऊन आत्महत्या केली. घटनेमुळे संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेची माहिती मिळताच जिल्हाध्यक्ष भरोसे यांनी शुक्रवारी या कुटूंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच या कुटुंबाला २५ हजार रुपयांची तात्पुरती आर्थिक मदत सुपूर्त केली.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीची आचारसंहीता लागू: ७ नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात अनेक गोष्टींवर लागले निर्बंध

**मोहन धारासूरकर**
**परभणी/प्रतिनिधी-** राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूक- २०२५ साठीचा कार्यक्रम ४ नोव्हेंबर रोजी घोषित केला आहे. त्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील गंगाखेड, जिंतूर, सेलू, मानवत, पाथरी, सोनपेठ, पुर्णा या नगरपरीषद कार्यक्षेत्रात आचार संहिता लागू आहे. त्यामुळे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी ज्या ठिकाणी मतदान होणार आहे, त्या ठिकाणी विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.

कार्यालयांसह विश्रामगृहांवर पूर्णतः निर्बंध... जिल्ह्यातील गंगाखेड, जिंतूर, सेलू, मानवत, पाथरी, सोनपेठ, पुर्णा या नगरपालिका कार्यक्षेत्रात संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था आणि शासकीय विश्रामगृहांच्या आवारामध्ये कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने सभा घेणे, सदरील आवाराचा वापर राजकीय कामांसाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणूक संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट्स, पेंटींग्स, होर्डींग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहीणे, किंवा सदरील आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभने दाखविणे आणि निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करु नये, असा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

सार्वजनिक व खाजगी व्यक्तींच्या जागेवर झेंडे, भितीपत्रके लावण्यास निर्बंध... निवडणूक प्रचार मोहिमांच्यावेळी राजकीय पक्षांचे व उमेदवारांचे कार्यकर्ते खाजगी व सार्वजनिक इमारतींच्या भिंतीवर निवडणूक विषयक भित्तीपत्रके चिटकवून, घोषणा लिहून, निवडणूक चिन्हे रंगविण्यासाठी भिंतीचा वापर करतात, तसेच या गोष्टी इमारतीच्या मालकांची परवानगी न घेताच केल्या जातात व त्यांना त्या अतिशय त्रासदायक ठरतात, याबाबतीत सध्या अस्तित्वात असलेला सार्वजनिक मालमता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ व खाजगी वा सरकारी मालमता विद्रुपन कायदा, १९९५ खालील तरतुदी पुरेशा परिणामकारक आहेत, वरील प्रकारची अनिष्ट कृत्ये करणाऱ्या पक्षांविरुध्द, व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिला आहे.

नमुना मतपत्रिका छपाई करण्यास निर्बंध.... निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने, मुद्रणालयांच्या मालकांनी व इतर सर्व माध्यमांव्दारे छपाई करणाऱ्या मालकाने इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमुन देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चीत केल्याप्रमाणे कागद वापरणे, आयोगाने निश्चीत केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे. याबाबींवर निर्बंध घालण्यात आले आहे.

सार्वजनिक इमारत, रस्त्यावर रहदारीस अडथळा निर्माण होवू नये यासाठी निर्बंध... राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक इमारतींच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यांवर, निवडणूकी संबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊट्स, होर्डीग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होवू शकेल, अशी कोणतीही कृती करु नये, असा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत स्पष्ट सूचना निवडणूकीच्या प्रचार मोहीमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवुन मोठ्या आवाजातुन प्रचार केल्यास ध्वनीप्रदुषण होणे, सर्व सामान्य लोकांच्या जीवनातील शांततेस व स्वास्थ्यास बाधा पोहचण्याची व उशीरा रात्रीपर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालु ठेवण्याची शक्यता असल्यामुळे जिल्हादंडाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) मधील प्राप्त अधिकारानुसार निवडणूकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावर खालीलप्रमाणे निर्बंध घातले आहेत.ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकारी यांचे परवानगी शिवाय करता येणार नाही, सकाळी ६.०० वाजण्यापुर्वी आणि रात्री १०.०० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चीत ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरांसंबंधीत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील. हे आदेश निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत (दिनांक ०३ डिसेंबर २०२५ पर्यंत) अंमलात राहतील.

प्रचार वाहनांवर प्रचाराचे फलक, झेंडे लावण्यास परवानगी घेण्याचे निर्देश.... राजकीय पक्षाचे उमेदवार तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार, त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक हे निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झेंडे लावणे यासाठी परवानगी घेणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी म्हटले. फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजुला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासुन २ फुट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही, प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजुस तो लावता येणार नाही, फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी यांना निवडणूक प्रचारासाठी, निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरीक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही.

दहा पेक्षा अधिक मोटार गाडया वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध.... निवडणूक आयोगाने कोणत्याही परिस्थीतीत सुरक्षेसाठी असलेल्या मोटार गाड्या वाहने यांच्या ताफ्यात दहा पेक्षा अधिक वाहने नसावीत असे निर्देश दिले आहेत, ज्याअर्थी जिल्हयात स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातुन कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी दहा पेक्षा अधिक मोटार गाड्या वाहनांच्या ताफ्याचा वापर करण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहेत.

धरणे आंदोलने, मोर्चे, निदर्शने, उपोषणे करण्यावर निर्बंध जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, तालुका दंडाधिकारी यांची कार्यालये तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शासकीय विश्रामगृहे, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यांवर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा त्याच्या हितचिंतकाने धरणे आंदोलने, मोर्चे, निदर्शने, उपोषणे करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहे.

सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निर्बंध... जिल्हयातील धार्मिक स्थळे, रुग्णालये, शैक्षणीक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरते पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.

निवडणूक कालावधीत जात, धर्म, भाषावार शिबीरांच्या आयोजनाबाबत आवाहन... निवडणूक कालावधीत पोलीसांच्या परवानगी शिवाय जिल्ह्यात कुठेही कसल्याही प्रकारचे जात, भाषा, धार्मिक शिबीरांचे, मेळाव्यांचे आयोजनावर निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे.

उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करते वेळेस अवलंब करावयाची कार्यपध्दती... जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटार गाड्या वाहने यांचा समावेश नसावा. तसेच नामनिर्देशन पत्र दाखल कले आहे.

## पूर्णा पालिकेची निवडणुक स्वबळावर लढणार- भुमरे



**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा नगर परिषद आगामी निवडणूक भारतीय जनता पार्टी संपूर्ण ताकतीने लढणार असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी पूर्णा येथे आयोजित पत्रकार परिषद बोलताना केले पूर्णा येथे ६ नोव्हेंबर गुरुवार रोजी येथील राम मंदिर येथे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेण्यात आली होती. यावेळी भारतीय जनता पार्टीचे अविनाश काळे, आकाश लोहट, दिलीप गिराम, लक्ष्मीकांत कदम, राज ठाकर ,चंद्रकांत टाकळकर , सुनील डुबेवार, सुरेंद्र चिटणीस, डॉ .अजय ठाकूर, संजय अंभोरे ,रोशन एकलारे, बालाजी कदम, निलेश कुरे , सविता गुंडाळे ,साधना बिछडे, आदी उपस्थित होते यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष भुमरे यांनी सांगितले नगरपालिकेची निवडणूक भारतीय जनता पार्टी संपूर्ण ताकतीने लढणार असून इतर पक्षाच्या युती बाबत बोलणी चालू आहे युती न झाल्यास भारतीय जनता पार्टी स्वभावापासून सर्व प्रभागात आपली उमेदवार उभे करणार आहे नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा भाजपाचाच असेल असे ते म्हणाले प्रत्येक प्रभागात पाच ते सहा जण निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असल्याचेही त्यांनी सांगितले भारतीय जनता पार्टी विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले येत्या दोन दिवसात युतीचं चित्र स्पष्ट होईल असे त्यांनी सांगितले.

## इटोली येथे भव्य नागरी सत्कार व विकासकामांचा लोकार्पण सोहळा

### राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते विविध विकास कामांचे लोकार्पण

**पाथरी,/प्रतिनिधी-** इटोली येथे भव्य नागरी सत्कार व विकासकामांचा लोकार्पण सोहळा. राज्यमंत्री मेघराजदादा बोर्डीकर यांच्या हस्ते विविध विकास कामांचे लोकार्पण जिंतूर (प्रतिनिधी): जिंतूर तालुक्यातील इटोली पंचकोशी परिसरात शनिवारी, दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा व भव्य नागरी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा राज्याचे राज्यमंत्री तथा पालकमंत्री परभणी मा.ना. मेघनादिदी बोर्डीकर यांच्या शुभहस्ते पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.आ. रामप्रसादजी बोर्डीकर यांनी स्वीकारले असून या सोहळ्याला तालुका आणि जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाची रूपरेषा पाहता सकाळी ७:०० वाजता एस.के.एस. मेंढशाळा स्पर्धा, तसेच समता फाउंडेशन आणि इटोली ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व गरजू रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

यानंतर सकाळी ९ वाजता बसस्थानक परिसरात नागरी सत्कार सोहळा व विविध



विकास कामांचे लोकार्पण होणार आहे. कार्यक्रमात मा. गंगाधररावजी बोर्डीकर (संभापती कु.उ.बा.स. जिंतूर), मा. गोविंदभाऊ थिटे (तालुकाध्यक्ष भाजप जिंतूर), मा. प्रभाकरभाऊ देशमुख (माजी नगरसेवक जिंतूर), मा. सुरेशरावजी भुमरे (जिल्हाध्यक्ष भाजप परभणी), मा. पंडीतजी दराडे (अध्यक्ष सं. जि.नि.यो.समिती जिंतूर), मा. सौ. अरुणा काळे (माजी जि.प. सदस्य परभणी), मा. नानासाहेब राऊत (माजी जि.प. सदस्य परभणी), मा. रमेशजी दरगड (अध्यक्ष व्यापारी महासंघ जिंतूर), मा. सुंदरराव चव्हाण (उपसभापती कु.उ.बा.स. जिंतूर), तसेच मा. राजाभाऊ नागरे (मा. सभापती कु.उ.बा.स. बोरी) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन मा. सौ. संगीता जगदीशराव घुगे सरपंच इटोली यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून ग्रामपंचायत इटोली व सर्व मान्यवर ग्रामस्थांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## सोनपेठ नगर परिषद निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

**बाबासाहेब गर्जे**
**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ नगर परिषद निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस प्रशासनाची माहिती सोनपेठ - राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाने होऊ घातलेल्या सोनपेठ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी येथील प्रशासन पूर्ण ताकतीनिशी सज्ज असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा सोनपेठ चे तहसीलदार सुनील कावरखे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे सांगितले आहे. गुरुवार दि.६ नोव्हेंबर रोजी तहसील कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सोनपेठ नगरपरिषद निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली असून यामध्ये ३१ ऑक्टोंबर रोजी अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यानुसार निवडणुकीचा कार्यक्रम पुढील प्रमाणे जाहीर करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रम ६ नोव्हेंबर रोजी जाहीर केला असून त्या अनुषंगाने नामनिर्देशन पत्र वेबसाईटवर भरण्याकरिता १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत वेळ उपलब्ध असणार आहे. नाम निर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत असून रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार नसल्याची माहिती देण्यात आली आहे. तसेच नामनिर्देशन पत्राची छाननी व वैद्यरित्या नामनिर्देशित झालेल्या




उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक १८ नोव्हेंबर रोजी सकाळी अकरा वाजल्यापासून सुरू होणार आहे. त्यानंतर नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक १९ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत ठेवण्यात आला आहे. तसेच वैद्यरीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसाच्या आत जिल्हा न्यायधीशांकडे अपील करता येणार आहे. त्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी मात्र दिनांक २५ नोव्हेंबर पर्यंत शेवटची तारीख असणार आहे. निवडणूक चिन्हे नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक २६ नोव्हेंबर आहे. त्यानंतर आवश्यक असल्यास २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच पर्यंत मतदान घेण्यात येणार आहे. झालेल्या मतदानाची मतमोजणी तीन डिसेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजल्यापासून सुरू होणार असून संध्याकाळी मतमोजणीनंतर निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर दहा डिसेंबर पूर्वी कलम १९ मधील तरतुदीनुसार शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या होत असलेल्या निवडणुकीदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी घेऊन चोख बंदोबस्त करण्याची जबाबदारी सोनपेठ पोलीस स्टेशनच्या वतीने, पोलीस निरीक्षक अशोक गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी दिली आहे. होत असलेल्या सोनपेठ नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी संपूर्ण प्रशासन सज्जा असून नागरिकांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करून प्रशासना सहकार्य करण्याचे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सुनील कावरखे यांनी केले आहे. यावेळी झालेल्या बैठकी दरम्यान तहसीलदार सुनील कावरखे,सपोनी विनोद चव्हाण,न.प.चे मुख्याधिकारी गणेश गांजरे,नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल, उदय पांडे हे उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वंदे मातरम सामूहिक गीत गायनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ नोव्हेंबर -**

शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.७ नोव्हेंबर रोजी राज्यातील सर्व शासकीय आयटीआय मधील मैदान व क्रीडा संकुल या ठिकाणी एकाच वेळी वंदे मातरम या गीतास १५० वर्ष पूर्ण झाली असल्याने साध शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येत आहे. जनमानसात देशभक्तीची भावना या गीताने रुजवावी या हेतूने महाराष्ट्रातील सर्व तालुक्यांमध्ये या सामुदायिक गीताचे समूह गान, लघु नाटिका सादरीकरण, प्रमुख वयाची मार्गदर्शन इत्यादी उपक्रम राबवले जाणार आहेत. शिक्षणमहर्षी सीना आलूरे गुरुजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या वतीने तालुका क्रीडा संकुल तुळजापूर येथे सकाळी ९.३० वाजता तहसीलदार तुळजापूर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

तसेच सर्व शासकीय कार्यालयाचे प्रमुख, कर्मचारी, शहरातील सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व सर्व नागरिक असे जवळपास ५००० जण उपस्थित राहणार आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### उद्धव ठाकरे यांचा शेतकरी संवाद दौरा; करजखेडा येथे बळीराजांशी थेट संवाद

**धाराशिव, दि.६ नोव्हेंबर -**

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा संवाद दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी, त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील करजखेडा येथे शेतकरी बांधवांशी संवाद साधला. या संवादादरम्यान शेतकऱ्यांनी अतिवृष्टी आणि नुकसानीबाबत आपली व्यथा मांडली. अतिवृष्टीच्या काळात मदत तर सोडाच, पण कुठलाही मंत्री आमच्या भागात फिरकला नाही, अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. बळीराजांचे मनोबल वाढवत उद्धव ठाकरे म्हणाले, संकट कितीही गंभीर असलं तरी खचायचं नाही, आत्मविश्वास ठेवा; शिवसेना सदैव तुमच्या सोबत आहे. या कार्यक्रमास शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, अंबादास दानवे, आमदार मिलिंद नार्वेकर, खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाप्रमुख आमदार कैलास पाटील आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### सागर शेट्टी यांच्या कन्येचा वाढदिवस आश्रमशाळेत साजरा

**तुळजापूर, दि.६ नोव्हेंबर -**

सोलापूर येथील तरुण व्यापारी सागर रमण शेट्टी यांच्या कन्या श्रीजा हिचा पहिला वाढदिवस तुळजापूर येथील एकलव्य आश्रम शाळेत साजरा करण्यात आला. अवांतर खर्च टाळून, बॅनरबाजी न करता आणि अत्यंत साधेपणाने साजरा झालेल्या या वाढदिवस उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले. रमण शेट्टी कुटुंबीयांनी आश्रम शाळेत येऊन तेथील सर्व विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन दिले. विद्यार्थिनींनी श्रीजाचे औक्षण करून तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. समाजातील वंचित घटकांशी आनंद वाटण्याचा आणि सामाजिक दायित्व जपण्याचा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. या प्रसंगी मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, फुलाजी ताटीकुंडलवार, बालाजी भांडेकर, मयूर अंतरेड्डी, अशोक राठोड, रमाकांत पवार, सुनिता राठोड, लक्ष्मी पवार, अनिल घुगे, अशोक बनकर, दयानंद भडगे, अण्णासाहेब मगर, हरीश मगदूम, तसेच सोलापूर येथील वैजनाथ शेट्टी, सागर शेट्टी, सोमनाथ शेट्टी यांच्यासह विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.



### सरस्वती सेंद्रिय शेतकरी गटामार्फत महिला शेतकऱ्यांना ज्वारी बियाण्यांचे वाटप

**अणदूर, दि.६ नोव्हेंबर -**

अणदूर येथील सरस्वती सेंद्रिय शेतकरी गटाच्या मार्गदर्शनाखाली, गटातील महिला शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान अंतर्गत कृषी विभागाच्या वतीने रब्बी ज्वारीचे मोफत बियाणे वाटप करण्यात आले. हा गट महिलांना शेतीत स्वावलंबी बनविण्यासाठी, तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. सेंद्रिय शेतीबाबत नवनवीन तंत्रज्ञान महिलांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य देखील या गटामार्फत होत आहे. गटाच्या अध्यक्ष बाबई लक्ष्मण चव्हाण आणि सचिव विजया नेमिनाथ कंदले यांच्या प्रयत्नातून गटातील २५ महिला सदस्यांना प्रत्येकी ४ किलो महाबीज सुधारित ज्वारीचे बियाणे मोफत देण्यात आले. या वाटप कार्यक्रमावेळी गटातील सर्व महिला शेतकरी उत्साहाने उपस्थित होत्या.



### उमेश कदम याचे विभागीय स्पर्धेत यश

**परंडा, दि.६ नोव्हेंबर -**

लातूर येथे पार पडलेल्या विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत कल्याणसागर माध्यमिक विद्यालय, डोमगाव (ता. परंडा) येथील इयत्ता दहावीचा विद्यार्थी उमेश नवनाथ कदम याने १७ वर्षांखालील गोळाफेक स्पर्धेत विभागात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे उमेश कदम याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजयी विद्यार्थ्याला क्रीडाशिक्षक राजाभाऊ शिंदे आणि अंगद लांडगे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी उमेश कदम याचा सत्कार करून त्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेच्या सचिवा प्रज्ञाताई कुलकर्णी, कल्याणसागर समूहाचे मार्गदर्शक विकास आप्पा कुलकर्णी, मुख्याध्यापक सुबोधसिंह ठाकूर, तसेच चंद्रकांत पवार, किरण गरड, समरजीतसिंह ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

# महायुतीत दोस्ती की कुस्ती? : परंडा नगरपरिषदेच्या निवडणुकीत रंगणार चुरस



### परंडा न.प. निवडणूक कार्यक्रम

उमेदवारी अर्ज भरण्याची सुरुवात: १० नोव्हेंबर, अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत: १७ नोव्हेंबर, मतदान दिनांक: २ डिसेंबर, पदे: १ नगराध्यक्ष, २० नगरसेवक.

### जाकीर सौदागर यांना रोखण्यासाठी नेते एकत्र ..

माजी आमदार सुजितसिंह ठाकूर (भाजप), राहुल मोटे (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट), रणजीत ज्ञानेश्वर पाटील (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दिवाल, रमेशसिंह परदेशी, नुरुद्दीन चौधरी, आणि हनुमंत वाघमोडे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

राजकिय तरुण भारत दंगल

**तभा वृत्तसेवा / आप्पासाहेब शिंदे**
**परंडा, दि.६ नोव्हेंबर -**

परंडा नगरपरिषदेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शहरातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत आहे. सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) कडे सर्वाधिक इच्छुक उमेदवारांचा ओढा दिसून येत आहे.

मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांची युती होती. परंतु, यावेळी नगरपरिषद निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत असे म्हणत शिवसेना (शिंदे गट) स्वतंत्रपणे लढण्याची रणनीती आखत आहे. त्यामुळे सत्तेत राहण्यासाठी एकत्र फिरणाऱ्या महायुतीच्या नेत्यांना आता एकमेकांविरोधात लढावे लागणार आहे.

दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) चे प्रभावशाली नेते व माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांना रोखण्यासाठी सर्वपक्षीय नेतेमंडळी मोठी कसरत करत असल्याचे दिसते.

राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषदेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करताच पुन्हा नगराध्यक्ष जाकीर सौदागरच! असे बॅनर झळकू लागले. त्यामुळे शहरात राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.

माजी मंत्री आणि आमदार तानाजीराव सावंत यांचे समर्थक असलेले जाकीर सौदागर यांना पराभूत करण्यासाठी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर (भाजप), माजी आमदार राहुल मोटे (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे जिल्हाध्यक्ष रणजीत ज्ञानेश्वर पाटील, तसेच माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दिवाल, रमेशसिंह परदेशी, नुरुद्दीन चौधरी आणि ॲड. हनुमंत वाघमोडे हे नेते एकत्र येत आहेत.

हम भी कुछ कम नहीं! अशी घोषणा देत ते सौदागर यांना टक्कर देण्यासाठी सज्ज झाले आहेत.

परंडा नगरपरिषदेची निवडणूक यंदा चुरशीची होणार यात शंका नाही. या निवडणुकीत एक नगराध्यक्ष आणि २० नगरसेवक पदांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

सर्वच पक्षांच्या इच्छुक उमेदवारांची धावपळ सुरू झाली असून, जाकीर सौदागर यांनी १० प्रभागांतील उमेदवारांची प्राथमिक यादी निश्चित केली असल्याची माहिती आहे. सध्या तरी त्यांचे पारडे जड असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## कळंब नगरपालिकेच्या निवडणुकीत राजकीय गोंधळ

### युतीचे गणित अजूनही अनिश्चित...

**तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला**
**कळंब, दि.६ नोव्हेंबर -**

कळंब नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी स्वबळावर लढण्याची तयारी केली असून कार्यकर्त्यांनी आपल्या प्रभागात जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.



मात्र, युतीबाबत अजूनही स्पष्टता नसल्याने अनेक कार्यकर्त्यांची अवस्था कोणता झेंडा हाती घ्यावा? अशी झाली आहे. नामनिर्देशन दाखल करण्याची प्रक्रिया केवळ दोनच दिवसांवर येऊन ठेपली असताना, काही कार्यकर्ते आपल्या पक्षाकडून तिकीट न मिळाल्यास युतीतील अन्य पक्षाकडून संधी मिळते का याकडे लक्ष ठेवून आहेत.

या गोंधळात काहींना उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माघारी घ्यावी लागेल अशीही शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, या अनिश्चिततेमुळे स्थानिक नेतेमंडळींनाही रुसवे-फुगवे समजावून घेण्यात अडचण येत असून आगामी दोन दिवसांत राजकीय चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

### न.प. निवडणुकीत मिरवणुका, सभा व घोषणांवर बंदी

**वाशी, दि.६ नोव्हेंबर -**

राज्य निवडणूक आयोगाने नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकीची प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत आदेश जारी केला आहे.

या आदेशानुसार ४ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर या कालावधीत जिल्ह्यातील नगरपरिषद हद्दीत मिरवणुका, सभा, मोर्चे, घोषणा, वाद्यवाजने व निवडणूक प्रचारावर बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय व तहसील कार्यालये तसेच सर्व शासकीय विश्रामगृह परिसरात लागू राहणार आहे.

## माजी मंत्री आमदार तानाजीराव सावंत यांचा दोन दिवसीय मतदारसंघ दौरा

**आगामी निवडणुकीची तयारी... संघटन बांधणी व मार्गदर्शन करणार...**

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.६ नोव्हेंबर -**

परंडा मतदारसंघाचे आमदार आणि माजी मंत्री तानाजी सावंत हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसीय मतदारसंघ दौऱ्यावर येत आहेत. हा दौरा ७ आणि ८ नोव्हेंबर रोजी होणार असून, या दौऱ्यात ते मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन आगामी निवडणुकीची तयारी, संघटन बांधणी आणि नगरपरिषद निवडणुकीसाठी मार्गदर्शन करणार आहेत.

दौऱ्याचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. ७ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता भैरवनाथ साखर कारखाना, सोनारी येथे परंडा तालुका ग्रामीण बैठक होईल. सायंकाळी ६ वाजता जाकिरभाई सौदागर यांच्या निवासस्थानी परंडा शहर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दि.८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता साहिल फंक्शन हॉल, भूम येथे भूम नगरपरिषद बैठक, दुपारी १ वाजता त्याच ठिकाणी भूम तालुका ग्रामीण बैठक, तर दुपारी ३ वाजता शिवशक्ती साखर कारखाना, तांदुळवाडी (वाशी) येथे वाशी तालुका व शहर बैठक होणार आहे.



या बैठकींमधून पक्षाची संघटना मजबूत करणे, आगामी निवडणुकांसाठी रणनीती ठरवणे आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे हा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले. जिल्हाप्रमुख दत्ताअण्णा साळुंखे यांनी सर्व पदाधिकारी, युवासेना व महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### मोघा खुर्द येथे हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.६ नोव्हेंबर -**

तालुक्यातील मोघा खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह, सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य सोहळा दि.७ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत सद्गुरु वासकर महाराज आणि श्री शिवराम बुवा दिंडेगावकर यांच्या आशीर्वादाने तसेच हभप. संत मारुती महाराज कानेगावकर व हभप. ज्ञानेश्वर माऊली महाराज अचलबेट येथे संपन्न होणार आहे.

कार्यक्रमात कीर्तन, भजन, गाथा, हरिपाठ व भागवत कथा यांचे आयोजन करण्यात आले असून धनराज महाराज रिंगणीकर, कुलदीप सूर्यवंशी महाराज, सागर बोराटे महाराज, नितीन जगताप महाराज, संकेत यादव महाराज, तुकाराम हजारे महाराज आणि गणेश सोनवणे महाराज यांचे कीर्तन होणार आहे.

**ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपला धक्का...**

## माजी नगरसेवक संजय बताले यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ नोव्हेंबर -**

नळदुर्ग शहरातील ज्येष्ठ नेते, जय हिंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक संजय बताले यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात प्रवेश केला आहे. नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेला हा प्रवेश भाजपसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

नगरपालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सर्वच पक्ष प्रचार आणि उमेदवारी तयारीत व्यस्त आहेत. त्याचवेळी नळदुर्गमध्ये संजय बताले यांच्या निर्णयामुळे राजकीय समीकरणात बदल होण्याची चिन्हे आहेत.



संजय बताले यांचा प्रवेश मुंबई येथे झाला असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत त्यांचा आणि त्यांच्या समर्थकांचा जाहीर पक्षप्रवेश झाला.

यावेळी ना. दत्ता भरणे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार राहुल मोटे, प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, प्रदेश सचिव गोकुळ शिंदे, अल्पसंख्यांक विभागाचे उपाध्यक्ष शफीभाई शेख, धाराशिव जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, तुळजापूर तालुका अध्यक्ष बबलु सुर्यवंशी, नळदुर्ग शहराध्यक्ष अजित जुनोदी, समीर मोरे व उमर शेख उपस्थित होते.

संजय बताले यांच्यासोबत रवी राठोड, विनायक जाधव, आनंद पवार, योगेश सुरवसे, बापु दुरुगकर, मुन्ना इनामदार, ॲड. लखन इंगोले आदी कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

संजय बताले यांना राजकारणाचा त्रिकालीन अनुभव असून, त्यांनी तीन कार्यकाळ नगरसेवक म्हणून यशस्वीपणे काम केले आहे. नळदुर्ग शहरात त्यांचा व्यापक जनसंपर्क आणि प्रभाव लक्षात घेता, त्यांच्या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) ला आगामी नगरपालिका निवडणुकीत राजकीय बळकटी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## तुळजाभवानी मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त दीपोत्सव

### जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते कल्लोळ तीर्थाचे पूजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ नोव्हेंबर -**

त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्री तुळजाभवानी मंदिरात भक्तिमय वातावरणात दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक श्रद्धा, दिव्यांच्या तेजाने उजळलेला मंदिर परिसर आणि भक्तांची गर्दी यामुळे संपूर्ण परिसरात धार्मिक उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष व जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी सपत्नीक कल्लोळ तीर्थाचे पूजन केले. त्यानंतर मंदिर परिसरात दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सौमय्याश्री पुजार, तहसीलदार व व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, लेखापाल सिद्धेश्वर इंतुले, भंडारपाल नागेश शितोळे, जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, अभिजित तेरखेडकर, उपाध्ये बंडो पाठक तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दीपोत्सवाचे चोख व्यवस्थापन भंडारपाल नागेश शितोळे यांनी केले. मंदिर परिसरात हजारो दिव्यांची आरास, आकर्षक रांगोळ्या आणि सुंदर सजावटीने परिसर उजळून निघाला होता. भाविकांनी दीपदान करून भक्तिभावाने देवीचे दर्शन घेतले.



त्रिपुरारी पौर्णिमेला भगवान शंकराने त्रिपुरासुराचा वध केला होता, त्याच्या स्मरणार्थ हा दिवस ‘देवदिवाळी’ म्हणून साजरा केला जातो. भगवान शंकराच्या विजयाच्या आनंदार्थ देवतांनी दिवे लावल्याने दीपोत्सव साजरा करण्याची परंपरा आजही टिकून आहे.

धार्मिक मान्यतेनुसार हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. भगवान शंकर आणि भगवान विष्णू यांच्या पूजेस या दिवशी विशेष महत्त्व असते. भाविकांनी या निमित्ताने पूजन, दर्शन आणि दीपदानाचा लाभ घेतला.

## दातृत्वातून दिला मायेचा स्पर्श; नागेशे बंधुसाठी कपडे व उबदार पांघरुन



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.६ नोव्हेंबर -**

दसरा-दिवाळीचे सण उत्साहाने साजरे होत असले तरी समाजातील काही घटक आर्थिक अडचणींमुळे या आनंदापासून वंचित राहतात. अशाच गरजू व्यक्तींना मायेचा स्पर्श देण्यासाठी सेवानिवृत्त प्राध्यापक विश्वासराव जाधवर यांनी दातृत्वाचे उदाहरण घालून दिले.

गेल्या पन्नास वर्षांपासून गाय-गुरांचे पालन करणारे प्रकाश रामभाऊ नागीशे (वय ६५) तसेच कळंब आडत बाजारात दुकानाची राखण करून उपजीविका करणारे अनिल रामभाऊ नागीशे (वय ६२) या बंधूंचा प्रा. जाधवर यांच्या हस्ते शर्ट, पॅन्ट, धोतर, टोपी आणि शाल देऊन सत्कार करण्यात आला. या दातृत्वपूर्ण उपक्रमाने प्रेरित होऊन आडत व्यापारी जुगलकिशोर मालपाणी यांनी थंडीच्या दिवसात या दोघा बंधूंना उबदार पांघरूण भेट देऊन मायेची रघ अर्पण केली.

या प्रसंगी हभप. महादेव महाराज अडसूळ, माधवसिंग राजपूत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वंदे मातरम् गीताचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

## शेकडो विद्यार्थ्यांनी एकाच वेळी गायले वंदे मातरम्



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**

वंदे मातरम् या गीतास आज १५० वर्षे पूर्ण होत आहेत. ही बाब सर्व देशवासीयांसाठी अभिमानास्पद आहे. त्याअनुषंगाने आज येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला मैदानावर हजारो विद्यार्थी, तरुणांच्या उपस्थितीत 'वंदे मातरम' गायनाचा सामूहिक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी वंदे मातरम् पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी कृष्णा देशमुख यांनी वंदे मातरम् गितासंदर्भात सखोल माहिती दिली. वंदे मातरम् गिताने भारतीयांना एकत्र आणण्यात आणि देशभक्तीची भावना जागृत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी हे गीत लिहिले असून, १८९६ साली रवींद्रनाथ टागोर यांनी प्रथमच ते गायले होते. वंदे मातरम् ने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अत्यंत प्रेरणादायी भूमिका निभावली. वंदे मातरम् हे भारतमातेच्या ममतेचे प्रतीक आहे आणि ते ऐकताना प्रत्येक भारतीयाच्या मनात देशप्रेमाची भावना जागृत होते. राज्यातील शासकीय तालुका व जिल्हा औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, प्रमुख वक्ते कृष्णा देशमुख, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, महावितरणचे अधीक्षक अभियंता राजेशसिंग चव्हाण, शिक्षण अधिकारी (योजना) संदीप सोनटक्के, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी विशाल रांगणे, प्राचार्य आर. व्ही.बोथीकर, आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या मैदानावर अनेक शाळेच्या विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख वक्ते कृष्णा देशमुख यांनी वंदे मातरम् हे राष्ट्रीय गीत सर्व शाळांमधून नियमित गायले जावे तसेच राष्ट्रभक्ती आणि देशप्रेम निर्माण करणाऱ्या वंदे मातरम् गीताचे महत्व सांगितले. यावेळी मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे यांनीही मार्गदर्शन केले.

वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचे जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी गाण केले. यावेळी शहरातून रॅली काढीत विद्यार्थ्यांनी भारत माता की जय, वंदे मातरम् चा जयघोष केला. या कार्यक्रमाला शहरातील शाळा, शिक्षक, मुख्याध्यापक यांची उपस्थिती होती.

# पोलिस विभागाच्यावतीने सायबर जनजागृतीवर मार्गदर्शन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**

शहरातील पोद्दार इंटरनॅशनल स्कूल जवळापळसी रोड येथे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या सूचनेनुसार सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी मुलांना सायबरविषयी माहीती दिली.

सदर प्रसंगी पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांनी मुलांना मार्गदर्शन केले व मुलांना अनोळखी गेमिंग एप्लीकेशन डाउनलोड न करण्याबाबत व मोबाईल हाताळताना योग्य ती खबरदारी घेण्याबाबत सूचना दिली. तसेच मुलांना अनोळखी एप्लीकेशन पासून काही सायबर चोरटे त्रास देत असतील किंवा ब्लॅकमेल करत असतील तर तात्काळ सायबर पोलिसांशी किंवा जवळच्या पोलिसांशी तसेच आई-वडिलांना शिक्षकांना सांगण्याचे आवाहन केले. आई वडीलांच्या मोबाईलवर अनोळखी गेम ॲप्लीकेशन डाऊनलोड केल्यास त्यांच्या बँक अकाऊंटमधील रक्कम गायब होण्याचा धोका असतो याबद्दलही मार्गदर्शन केले.

सायबर फ्रॉड झाल्यास टोल फ्री नंबर १९३०, १९४५ तसेच ११२ यावर सुद्धा २४ तास कधीही संपर्क करण्याचे आवाहन केले. सदर प्रसंगी महाराष्ट्र शासनाच्यावतीने सायबर जनजागृती महिना राबविण्यासंदर्भात सपोनी शिवसांब घेवारे यांनी सायबर पीपीटीचे प्रदर्शन करून मुलांना ऑनलाईन फ्रॉड पासून सावधान राहण्याचे व स्वतःची वैयक्तिक माहिती इंटरनेटवर विविध अप्लिकेशनवर सार्वजनिक न करण्याबाबत सूचना दिल्या. तसेच दामिनी पथकाचे पोलीस अंमलदार आरती साळवे यांनी सुद्धा मुलांबाबत विशेषता मुलींबाबत सुद्धा काही छेडछाडीची तक्रार असल्यास २४ तास कधीही पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन केले. सदर प्रसंगी पोनि मोहन भोसले, सपोनि घेवारे, शाळेचे प्राचार्य अर्चना देशपांडे, तसेच शिक्षक वृंद व सायबरचे अंमलदार दत्ता नागरे, प्रदीप झुंगरे यांच्यासह मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

# हिंगोली शहरात साडेचार हजारांच्या बनावट नोटा सापडल्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**

शहरात एका विधीसंघर्षग्रस्त बालकासह दोघांच्या तपासणीमध्ये ४ हजार ५०० रूपयांच्या बनावट नोटा सापडल्या असून याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा झाला आहे. पोलिसांनी दोघांचीही चौकशी सुरू केली आहे.

शहरात पालिका निवडणुकांचे वारे वाहू लागले असून या निवडणुकीच्या निमित्ताने शहरात चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. याशिवाय रात्री दहा वाजल्यानंतर फिरणाऱ्यांची चौकशी केली जात आहे. त्यासाठी हिंगोली शहर पोलिसांनी स्वतंत्र पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून शहरात येणाऱ्या सर्व रस्त्यावर नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जात आहे.

विशेष म्हणजे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दोन दिवसांपूर्वी शहरातील विविध भागात भेटी देत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पाहणी करीत नागरिकांशी संवाद साधला तसेच नागरिकांना नियमांचे पालन करण्याचे तसेच शांततेचे आवाहन केले आहे.

दरम्यान, हिंगोली शहरात दि ६ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जमादार दिलीप धामणे, शेख मुजीब, गणेश लेकुळे, शंकर ठोंबरे, जोगे यांचे पथक गस्तीवर होते. सदर पथक इंदिरा गांधी चौकात आल्यानंतर त्याठिकाणी दोघे जण संशयास्पदरित्या फिरतांना दिसून आले. पोलिसांनी त्यांची चौकशी करण्यास सुरूवात केल्यानंतर त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. या प्रकारामुळे पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेतले. त्यामध्ये एका विधी संघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. तसेच देवानंद उर्फ सोनू जाधव याचाही समावेश आहे. पोलिसांनी त्यांची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यांच्याकडे ४ हजार ५०० रूपयांच्या प्रत्येकी पाचशे रूपयांच्या बनावट नोटा आढळल्या आहेत. पोलिंसांनी सदरील नोटा जप्त केल्या आहेत. या प्रकरणी जमादार शेख मुजीब यांच्या तक्रारीवरून हिंगोली शहर पोलिस ठाण्यात शुक्रवार दि ७ नोव्हेबर रोजी गुनहा दाखल करण्यात आला आहे. या दोघांची सखोल चौकशी केली जात असून त्यानी या नोटा कुठून आणल्या होत्या याची माहीती घेतली जात असल्याचे सुत्रांनी सांगितले.



**हिंगोली- जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी माजी उपनगराध्यक्ष शेख निहाल यांच्या कार्यालयास भेट दिली. यावेळी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ. राजू नवघरे, जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, शेख निहाल, प्रकाश थोरात, अनिल पतंगे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. छाया-विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### केंद्रप्रमुख पदासाठी ऑनलाईन परीक्षा

हिंगोली- राज्यातील सर्व जिल्हा परिषदेमधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५चे ऑनलाईन पद्धतीने दि. १ ते ५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात येणार होती. काही तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव या परीक्षेचे आयोजन जानेवारी/फेब्रुवारी-२०२६ मध्ये घेण्याचे नियोजन आहे. सुधारित परीक्षेच्या तारखा तथावकाश परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. या परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याची मुदत दि. १० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत देण्यात आली होती. ही मुदत वाढवून आता दि. १ जानेवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे उमेदवारांचा अनुभव, शैक्षणिक पात्रता ही दि. १ जानेवारी, २०२६ रोजीची अंतिम समजण्यात येईल. त्यानुसार सर्व पात्र उमेदवारांनी, परीक्षार्थींनी विहित मुदतीत आवेदनपत्र भरण्याची कार्यवाही करावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### राहोली खु. येथील तरूण बेपत्ता



हिंगोली- तालुक्यातील राहोली खुर्द येथील किशोर नारायण खिल्लारे वय ३३ हा तरूण दि २५ सप्टेंबरपासून सकाळी घरातून निघून गेला आहे. आजपावेतो तो घरी परत न आल्याने नारायण तुकाराम खिल्लारे यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दिली आहे. सदरील तरूण सावळा, सोनेरी केस, सडपातळ बांधा, पांढऱ्या भगव्या रंगाचा टिशर्ट, निळी जीन्स पँट तसेच हातावर किशोर नाव गोंदलेले आहे. कोणाला या वर्णनाची व्यक्ती आढळल्यास हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोनि श्यामकुमार डोंगरे यांनी केले आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून शरीर संबंध ठेवल्याप्रकरणी तरूणाविरोधात गुन्हा दाखल

हिंगोली- तालुक्यातील एका गावातील अनुसूचीत जातीच्या तरूणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत सन २०२३ पासून ते आजपर्यंत शरीर संबंध ठेवले तसेच त्याच्या घरच्या लोकांविरोधात दाखल केलेला गुन्हा मागे का घेत नाहीस असे म्हणून थापडाबुक्यांनी मारहाण करून तिला शहरानजीक असलेल्या न्यु बंजारा हॉटेल येथे कोंडून ठेवल्याप्रकरणी सचिन शिवाजी घोंगडे याच्याविरोधात हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार केंद्रे, पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक श्रीमती वग्गे तपास करीत असून आरोपी अद्याप अटक नाही.

# पदवीधर मतदारसंघाच्या यादीसंदर्भात महत्वाचा खुलासा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर विधान परिषद मतदार संघाची मतदार यादी नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम सुरु आहे. मतदार नोंदणी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून दि. ६ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या मतदारांची प्रारुप मतदार यादी दि. २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच प्रारुप यादीबाबत दावे व हरकती सादर करण्यास संधी देऊन त्यावर निर्णय घेण्यात येणार आहे. त्यांनतर दि. ३० डिसेंबर, २०२५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तथापि, विधान परिषदेच्या या जागा डिसेंबर-२०२६ मध्ये रिक्त होणार आहेत. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० मधील तरतुदीनुसार मतदार याद्यामध्ये संबंधित निवडणुकांकरिता नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत सुधारणा, नव्याने समावेशन किंवा वगळणी करता येते. उपरोक्त नमूद पदवीधर विधान परिषद मतदार संघाच्या मतदार याद्या दि. ३० डिसेंबर, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्यानंतरही त्या याद्यांमध्ये ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने नव्याने नाव समाविष्ट करण्याची संधी पात्र मतदारांना संबंधित विडणुकांच्या नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत उपलब्ध असणार आहे, अशी माहिती ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# जिल्ह्यातील तीनही नगर पालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाची प्लॅन बी तयार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**

आगामी नगर पालिका निवडणुकीत महायुतीसोबत लढण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडे आग्रही असलेल्या भारतीय जनता पक्षाने महायुती न झाल्यास जिल्ह्यातील तीनही नगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्यावतीने प्लॅन बी तयार करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. सध्या जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून महायुतीतील भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटामधील स्थानिक नेत्यांमध्ये एकवाक्यता येत नसल्याचे चित्र दिसत आहे. हिंगोली नगराध्यक्षपद हे भाजपला सोडण्यात यावे अशी भाजपची आग्रही मागणी आहे. यापूर्वीही हिंगोलीची नगराध्यक्षपदाची जागा भाजपला सोडण्यात आली होती. यावेळी ओबीसी महिला प्रवर्गासाठी नगराध्यक्षपदाची जागा सुटली आहे. माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या पत्नी सौ नीता बांगर यांचे नाव भाजपकडून जवळपास निश्चित झाले असतांना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा आ संतोष बांगर हे मात्र मागील काही महिन्यांपासून ही जागा शिवसेनेला सुटावी यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहेत. त्यांचे बंधू माजी नगरसेवक श्रीराम बांगर यांच्या पत्नीला नगराध्यक्षपदाच्या रिंगणात उतरवण्याची तयारी करीत आहेत.

भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात हिंगोली शहरात मोठी रस्सीखेच सुरू झाली असून बैठका आणि भेटीगाठीवर जोर देण्यात येत आहे. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे हे निवडणुक प्रमुख असल्यामुळे त्यांनी निवडणुकीसाठी कंबर कसली असून सकाळपासूनच व्यापारी, विविध सामाजिक संघटना तसेच प्रतिष्ठीत नागरिक, डॉक्टर्स, वकील संघ आदींसोबत चर्चा सुरू आहे. दुसरीकडे आ. संतोष बांगर यांचेकडूनही पक्ष प्रवेश सोहळे, भेटीगाठी सुरू आहेत. भाजप आणि शिवसेना यांच्यात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरू झाल्या आहेत. यावरून महायुती होईल याबाबत शंकाच आहे.

दरम्यान भाजपने हिंगोली, वसमत आणि कळमनुरी या तीनही नगर पालिका स्वतंत्रपणे लढण्यासाठी प्लॅन बी तयार केला असल्याचे समजते. हिंगोली आणि वसमत या दोन्ही शहरांमध्ये भाजपचे नेटवर्क मजबुत आहे. तसेच दोन्ही नगर पालिकांवर भाजपचा नगराध्यक्ष राहीलेला आहे. वसमतमध्ये माजी नगराध्यक्ष शिवदास बोड्डेवार यांना तयार राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत तर कळमुनरी शहरात माजी नगराध्यक्ष सुरेश सारडा यांना तयारीला लागण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दुसरीकडे भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी शहरातील प्रत्येक वार्डात भाजपचा पॅनल तयार करण्यासाठी उमेदवारांची चाचपणी केली आहे.

# क्रांतीकारी शेतकरी संघटनेचा विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयात ठिय्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ नोव्हेंबर**

सेनगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्यावतीने तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना शासन निर्णयानुसार प्रति तीन हेक्टर १८५०० रूपये द्या, सिंचन विहीर व गोठा योजनांचे रखडलेले अनुदान तातडीने वितरीत करा, घरकुल योजनांचे हप्ते त्वरीत देण्यात यावेत, सोयाबीन हमी भाव केंद्रे सुरू करावेत, गावातील विद्युत तारा व खांबांची दुरूस्ती करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे गजानन कावरखे यांच्या नेतृत्वात पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. आंदोलनाची दखल घेत तहसीलदार यांच्या दालनात कृषी विभाग, महावितरण तसेच पंचायत समितीचे अधिकारी उपस्थित झाले. यावेळी शेतकऱ्यांशी चर्चा करण्यात आली तसेच मागण्या सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी नामदेव पंतगे, विठ्ठल सावके, संदीप मानमोठे, दिपक सावके, प्रवीत मते, श्याम मते, गजानन काळे, आत्माराम काळे, भागवत ढवळे, सर्जेराव वडकुते आदींसह शेतकरी बांधव उपस्थित होते. मागण्या मान्य न केल्यास मुंबई येथे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

# वसमत परिसरात अवैध वृक्षतोड

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ७ नोव्हेंबर**




तालुक्यात वाढत चाललेल्या अवैध वृक्षतोडीने संपूर्ण पर्यावरणच धोक्यात आले आहे. परिसरातील काही भागात रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेऊन ट्रॅक्टर, छोटे हायवा आणि सहाय्याने मोठ्या प्रमाणात झाडे तोडली जात असल्याने लोकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. नंबरप्लेट नसलेल्या गाड्या खोडांचे ढिग पाहूनही जबाबदार विभागांची शांतता या सगळ्यामुळे वृक्षतोड माफियांची 'हिम्मत' वाढली असून पर्यावरण प्रेमीमधून तीव्र संताप व्यक्त होते आहे.

वसमत परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैधपणे वृक्षतोड होत असल्याची दिसत आहे. तापमानात वाढ उष्णतेची लाट वन्यजीवांचे घर नष्ट मानव-वन्यजीव संघर्ष हे संपूर्ण परिणाम एकाच झाडाच्या तोडीनेही सुरू होतात, त्यामुळे वृक्षतोड हा केवळ 'वनगुन्हा' नसून मानवाच्या अस्तित्वावर आघात करणारा गुन्हा बनतो.कायद्यानुसारही कठोर शिक्षा ˉ तरीही अंमलबजावणी कुठे?महाराष्ट्र फॉरेस्ट ॲक्टनुसार कायद्यातील नियम कागदावर कडक असले तरी वसमत तालुक्यातील अंमलबजावणी मात्र अत्यंत ढिसाळ असल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे.वृक्षतोड रोखली नाही तर वसमतला भविष्यात पाणी, हवा आणि शेती संकटात येणार. यामुळे आता वनविभागनी तातडीने गस्त वाढवावी,अवैध वाहने जप्त करावी, वृक्षतोडीशी संबंधितांचे थेट गुन्हे दाखल करावे तसेच जबाबदार अधिकारी निष्क्रिय असल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# जुन्या भांडणाच्या रागातुन सिडकोत तरुणाचा खून

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून सिडको संभाजी चौक येथे शुभम भद्रे व साई वट्टमवार यांच्या वाद होऊन शुभम भद्रे जागीच मृत्यू पावला ही घटना गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास घडली.



सिडको भागात साई वटमवार यांनी केलेल्या मारहाणीत २३ वर्षीय शुभम किशन भद्रे रा. संभाजी चौक सिडको नांदेड वय २३ वर्ष याचा मृत्यू झाला. ही घटना ६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली. शुभमला लाथाबुक्याने गंभीर मारहाण केली. यामध्ये तो बेशुद्ध पडला तेव्हा त्याला त्याचे नातेवाईकांनी विष्णूपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता. रात्री ८ वाजेच्या सुमारास डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. याप्रकरणी ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळीच भेट देऊन तपास करून आरोपी साई वट्टमवार यास ताब्यात घेऊन जयश्री किशन भद्रे यांच्या फिर्यादीवरून ट्रॉसिटी क्ट नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील आरोपीस गळ्यावर धारदार ब्लेडचा वार आसल्याने तो दवाखान्यात उपचार घेत आहे. पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर हे अधिक तपास करत असल्याची माहिती पो.नि. रोकडे यांनी दिली.

# वंदे मातरम गीताच्या सामुहिक गायनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

वंदे मातरम या राष्ट्रभावना जागविणाऱ्या गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त आज जिल्ह्यात वंदे मातरम समूह गायन कार्यक्रम सर्वत्र उत्साहात संपन्न झाला. नांदेड येथे श्री गुरूग्रंथ साहिबजी भवन येथे हा कार्यक्रम हजारो विद्यार्थ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत राष्ट्रभक्तीच्या वातावरणात उत्साहात पार पडला.



श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, तहसिलदार संजय वारकड, गुरुद्वारा अधीक्षक हरजितसिंग कडेवाले, शहर पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैजने, जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सुर्यवंशी, शिक्षणाधिकारी माध्यमिक, प्राथमिक यांच्यासह शहरातील विविध शाळेतील शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आणि सार्वजनिक स्थळी सकाळी १० वा. एकाच वेळी वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांसह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि अभिमानाची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शिक्षण विभागाच्या समन्वयाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी दिल्ली येथील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत सामूहिक वंदे मातरम गीत गायन सुरु होते, हा कार्यक्रम सर्वांना दूरदृश्यप्रणालीद्वारे दाखविण्यात आला.

वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्षानिमित्ताने घेतलेल्या या सामूहिक गायन उपक्रमाने जिल्ह्यात देशभक्तीचा उत्साह आणि ऐक्याची भावना वृद्धिंगत झाली. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात 'वंदे मातरम' या गीताचा विशेष उल्लेखनीय प्रभाव राहिला आहे आणि हे गीत स्वातंत्र्य सैनिकांसाठी प्रेरणास्त्रोत बनले होते. थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली रचलेल्या 'वंदे मातरम' या गीताला शुक्रवारी ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान एकूण चार टप्प्यात राज्यात विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून कौशल्य विकास विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने राज्यभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. यावेळी विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् गीतावर आधारीत लघुनाटिका सादर केली.

## मतदानाचा वाढविण्यासाठी सकाळच्या सत्रात मतदान करावे : जगताप


**हदगाव**-नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आज रोजी नगरपरिषद हदगावात निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती



यावेळेस मतदारांनी भयमुक्त वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावा शक्यतो सकाळच्या सत्रातच आपले मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळेस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी गौरव वांडेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्यासह इतर विभागातले अधिकारी वर्ग उपस्थित होते. पुढे बोलताना जगताप म्हणाले की, येणारी नगरपरिषद च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भयमुक्त वातावरणात व निपक्षपाती पणे ही निवडणूक आपल्यास पार पाडायची आहे त्यामुळे मतदान यादी व मतदान केंद्रा बाबत जनजागृती केल्या जाईल मतदारांना काही अडचण असल्यास प्रत्येक ठिकाणी बी एल ओ हे मतदार यादी घेऊन उपस्थित राहणार त्यांना आपली अडचण सांगितल्यास आपले मतदान कुठे आहे याची माहिती दिली जाईल. मतदारांनी मतदानापासून वंचित न राहता आपला मतदानाचा हक्क बजविण्यासाठी दुपारच्या नंतर रांगा लावून रात्रीपर्यंत उभे न राहता सकाळच्या वेळेतच आपले मतदान करावे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमची पूर्ण यंत्रणा सज्ज असून निवडणूक व प्रचारादरम्यान आपणास काही अडचण व गैरप्रकार लक्षात आल्यास सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी गौरव वांडेकर यांच्याकडे तक्रार करावे असेही आव्हान शेवटी निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांनी केले.

## मिलींद काळेश्वरकर याची सहआयुक्त पदी (औषधे) पदोन्नती

**नांदेड**-मिलींद कृष्णराव काळेश्वरकर यांच्या कार्याची दखल घेत, सरकारने पदोन्नतीवर सहआयुक्त (औषधे) पदावर नागपूर येथे पदोन्नती केली आहे. नांदेड जिल्ह्यात अन्न व औषधी विभागात निरीक्षक म्हणून कार्य केलेले मिलींद काळेश्वरकर हे अतिशय प्रामाणिक



व्यक्तीमत्व म्हणून सर्वश्रूत आहेत. मिलींद काळेश्वरकर यापूर्वी यवतमाळ येथे सहाय्यक आयुक्त(औषधे) कार्यरत होते. त्यांना राज्य सरकारने ३१ऑक्टोबर रोजी पदोन्नती देत, नागपूर येथे सहआयुक्त पदावर विजमान केले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथील रहिवासी असलेले मिलिंद काळेश्वरकर यांनी १९९६ मध्ये आपली औषधी पदवी प्राप्त केल्यानंतर दहा वर्षे औषध उत्पादन कंपनीत छत्रपती संभाजी नगर येथे नोकरी केली. त्यानंतर त्यांनी यवतमाळ येथेच एक वर्ष ते दीड वर्ष डिप्लोमा इन फार्मसी कॉलेज मध्ये लेक्चरर म्हणून नोकरी केली . २००७ मध्ये सरळ सेवेने संभाजीनगर येथील पैठण तालुक्यातील ढाकेफळप्राथमिक आरोग्य केंद्रात औषध निर्माण अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. प्राथमिक आरोग्य केंद्रात नोकरी करीत असताना, २०१२ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या औषधी निरीक्षक गट ब परीक्षेत नांदेड येथे पदावर प्रथम नियुक्ती झाली होती. त्यांनी नांदेडला असताना त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने सर्व औषधी विक्रेत्यांच्या समस्या सोडविल्या वेळप्रसंगी शिष्टीने कडक नियमावली सुद्धा अवलंबले. एखाद्या वेळेस कुठे गैरप्रकार होत असतील, तर तेथे नियमानुसार शास्ति केली. तसेच त्यावेळी शिस्तप्रिय म्हणून नांदेडमध्ये काळेश्वरकर नावाचा चांगलाच दबदबा औषधी विक्रेत्यांच्या स्मरणात राहीला. त्यानंतर ते २०१५ ते २०१८ कालावधीत संभाजीनगर, २०१८ ते २०२०, यवतमाळ येथे औषधी निरीक्षक म्हणून कार्य केले. २०२० मध्ये ते सरळ सेवेने सहायक आयुक्त पदी पुन्हा एकदा संभाजी नगर येथे रुजू झाले. त्यानंतर सहआयुक्त होण्यापूर्वी ते यवतमाळ येथे २०२३ ते २०२५ सहायक आयुक्त म्हणून पदावर कार्यरत होते. दरम्यान महाराष्ट्र सरकारने सहायक आयुक्त पदावरील पदोन्नतीवर सह आयुक्त पदी नियुक्ती दिलेली आहे. नांदेड येथे यांनी केलेली सेवा नांदेडकर नागरिकांच्या नेहमीच लक्षात राहणार आहे. अत्यंत प्रामाणिक आणि गरजवंताला मदत करणारे अधिकारी म्हणून मिलिंद काळेश्वरकर यांची समाजात आणि औषधी विक्रेत्यामध्ये वेगळी ओळख निर्माण झालेली आहे.

## व्हाईस ऑफ मीडियाच्या माहूर तालुका अध्यक्षपदी इलियास बावाणी

**नांदेड** -व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटना, माहूर शाखेच्या तालुका अध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. व्हाइस ऑफ मिडिया पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे,राज्याध्यक्ष अनिल मस्के, जिल्हाध्यक्ष गणेश जोशी, यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले यांनी दि.०७ नोव्हेंबर रोजी एका छोटेखानी कार्यक्रमात व्हाईस ऑफ मीडियाच्या माहूर तालुका अध्यक्षपदी पत्रकार इलियास बावाणी यांची एकमताने नियुक्ती केली असल्याचे घोषित केले. यावेळी व्हाऑमि जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले, जेष्ठ पत्रकार नंदकुमार जोशी, वसंतराव कपाटे यांसह पत्रकार सचिन बेहेरे, गजानन कुलकर्णी, संजय बनसोडे, निखिल कोरडे, सादिक भाई किरमाणी, शेख रफिक भाई तसेच स्नेहांकित निलेश जयस्वाल, वसंतराव राठोड, दत्ता जाधव यांचे सह मान्यवर उपस्थित होते.या नियुक्तीबद्दल नेते, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व स्नेहांकित मंडळींकडून बावाणी यांचे अभिनंदन केले जात आहे.

# हिरकणी आयटीआयमध्ये वंदे मातरम् गीत गायन कार्यक्रम



**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. ७ नोव्हेंबर-**

येथील हिरकणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि. ०७ नोव्हेंबर रोजी तहसीलदार अभिजित जगताप यांचे अध्यक्षतेत तथा प्रमुख वक्ते जगदीश तावडे, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे, योगी शामजी भारती महाराज, महाराष्ट्र शासनाचे स्वच्छतादूत प.पु. साईनाथ महाराज, नगराध्यक्ष फिरोज दोसाणी, गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस, आयएमसी सदस्य संजय सुरोशे, सतीश कान्नव प्रप्रा. प्रतिभा पाटील यांचेसह उपस्थितांनी 'वंदे मातरम्' या भारत मातेच्या स्तुती गीताचा सोहळा संपन्न झाला.

यावेळी सर्व कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.प्रास्ताविक अश्विनी पोतदार यांनी केले. सूत्रसंचलन एस.एस.पाटील यांनी केले, तर के.पी. वाकोडे यांनी आभार मानले.

# नरसी येथील सेवा सहकारी संस्थेत आर्थिक अनियमिततेचा पर्दाफाश ; सचिव गादेवार निलंबित!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ७ नोव्हेंबर-**

नरसी सेवा सहकारी संस्थेतील आर्थिक गैरव्यवहाराच्या गंभीर आरोपांवरून सचिव एन. व्ही. गादेवार यांना निलंबित करण्यात आले आहे. हा निर्णय नांदेड जिल्हा देखरेख सहकारी संस्था म. नांदेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुमार बाकरे यांनी घेतला आहे.

संस्थेचे सभासद रविंद्र शिवाजीराव भिलवंडे यांनी केलेल्या तक्रारीत, संस्थेच्या व्यापारी संकुलाती ल दुकाने व गोदामे भाड्याने दिल्याची रक्कम अनेक वर्षे संस्थेच्या जमा-खर्च वह्यांमध्ये नोंदविली नसल्याचा आरोप करण्यात आला होता. २०१३ ते २०२४ या काळातील भाड्याची मोठी रक्कम संचालक मंडळाच्या परवानगीशिवाय उचलण्यात आल्याचा आरोप आहे.

चौकशी अधिकारी अजयकुमार कोंडलवाडीकर यांनी वारंवार लेखी, दूरध्वनी व प्रत्यक्ष संपर्क साधूनही गादेवार यांनी चौकशीसाठी आवश्यक कागदपत्रे न सादर करता उलट जे करायचे ते करा अशा उद्धट भाषेत उत्तर दिल्याची नोंद चौकशी अहवालात आहे. या गैरवर्तनाची गंभीर दखल घेत, कारणे दाखवा नोटीस देऊनही गादेवार यांनी कोणताही खुलासा सादर केला नसल्याने अखेरीस निलंबनाची कारवाई करण्यात आली. या प्रकरणातील विभागीय चौकशीची जबाबदारी जी. आर. कौरवार, सहायक निबंधक ता. नायगांव यांच्याकडे सोपविण्यात आली असून, त्यांनी ६० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

निलंबन काळात गादेवार यांना अनुज्ञेय भत्ता मिळेल; मात्र त्यांनी कोणताही उद्योग वा नोकरी करता कामा नये. त्यांच्या निलंबन काळातील मुख्यालय म्हणून नांदेड जिल्हा देखरेख सहकारी संस्था निश्चित करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी बाकरे यांनी आदेशा त स्पष्ट केले आहे की, सहकारी क्षेत्रातील प्रामाणिकपणा आणि पार दर्शकते ला धक्का पोहोचविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

नरसी सेवासहकारी संस्थेतील हा गैरव्यवहार प्रकरण सहकारी क्षेत्रातील प्रामाणिकतेवरील विश्वासाला धक्का देणारा ठरत असून, विभागीय चौकशीतून सत्य बाहेर येण्याची सर्वत्र उत्सुकता लागली आहे.

# लोकसहभागातून सुंडगी गावात 'शिव पांदन रस्ता'

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ७ नोव्हेंबर-**

तालुक्यातील सुंडगी (बु.) गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून साकारलेल्या शिव पांदन रस्त्याचे माती काम पूर्ण झाले असून आता या रस्त्याचे खडीकरण करण्याची मागणी प्रशासनाकडे जोर धरू लागली आहे. सुंडगी (बु.) गावातील शेतकऱ्यांनी तहसीलदार, देगलूर यांना या संदर्भात निवेदन दिले असून ग्रामपंचायतीनेही ठरावाद्वारे या मागणीला मान्यता दिली आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, मौ. सुंडगी (बु.) येथील पांडूरंग लालु कांबळे ते पांडूरंग चंद्रप्पा पाटील यांच्या शेतीपर्यंत जाणारा हा रस्ता सुमारे दोन किलोमीटर लांबीचा असून शेतकऱ्यांचा दळणवळणाचा हा मुख्य मार्ग आहे. या रस्त्याने



शेतातील माल, बियाणे व खत वाहतूक केली जाते. मात्र पावसाळ्यात हा रस्ता चिखलमय होऊन वाहतूक पुर्णपणे ठप्प होते, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

गावकऱ्यांनी स्वतःच्या श्रमदानातून आणि लोकसहभागातून या रस्त्याचे माती काम पूर्ण केले आहे. आता शासनाने किंवा प्रशासनाने पुढाकार घेऊन या रस्त्याचे खडीकरण करावे, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे. प्रशासनानेही तातडीने या मागणीवर लक्ष घालून रस्त्याचे खडीकरण केल्यास गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनावर दिगांबर हणमंतराव पाटील (भारतीय जनता पार्टी बुथ प्रमुख), विजय पाशमवार, शंकरराव पाटील, बाळासाहेब पाटील, कपिल देशमुख, लक्ष्मण बरसमवार, दिलीप पाटील, युवराज कांबळे (पोलीस पाटील), हणमंतराव बडगे, हणमंतराव तोटावाड, सुभाषराव बोईनवाड, मारोती बडेवार, शेषेराव चिंतलवाड, सुरेश देशमुख हवरगेकर, गंगाधर बरसमवार, शंकर बरसमवार आदीं शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, निवेदनाच्या प्रती जिल्हा दंडाधिकारी नांदेड, उपजिल्हाधिकारी देगलूर, देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे आ. जितेश अंतापूरकर यांनाही देण्यात आले आहेत.

# नगरपालिकेसाठी भाजपा इच्छुकांच्या मुलाखती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

होऊ घातलेल्या देगलूर , बिलोली , कुंडलवाडी नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या इच्छुकांच्या खा. डॉ. अजित गोपछडे , आ. जितेश अंतापुरकर आणि जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे आणि नांदेड महानगर अध्यक्ष अमरनाथ राजुरकर यांनी आज मुलाखती घेतल्या. या मुलाखतींना उदंड प्रतिसाद मिळाला असून असंख्य इच्छुकांनी मुलाखती दिल्या आहेत. यावेळी खा. डॉ.अजित गोपछडे, आ. जितेश अंतापुरकर, नांदेड महानगर अध्यक्ष तथा विधान परिषदेचे माजी आमदार अमरभाऊ राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ .संतुकराव हंबर्डे, लक्ष्मणराव ठक्करवाड, शंकरराव कंतेवार, शिवाजीराव देशमुख बळेगावकर आदींची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात सर्वच घटकांचा समतोल विकास साधला जात आहे . यात नांदेड जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी ही भरपूर तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीला उदंड यश मिळाले आहे . त्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये विजय मिळविण्यासाठी आणि सत्ता स्थापना करून सर्वसामान्यांचा विकास करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात जोरदार तयारी सुरू आहे. नांदेड दक्षिण भागातील देगलूर, कुंडलवाडी आणि बिलोली या अत्यंत महत्त्वाच्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगरपरिषदांच्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी सर्वात बलाढ्य पक्ष झाला पाहिजे किंबहुना या तिन्ही ठिकाणी भाजपाची सत्ता आली पाहिजे यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन सुरू आहे. या अनुषंगाने आज देगलूर, बिलोली, कुंडलवाडी नगर परिषदेची निवडणूक लढण्यासाठी इच्छुक असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या.

## घनकचरा व्यवस्थापनाची कामे पूर्ण करावीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील गावे मॉडेल करण्याच्या उद्देशाने सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे गावस्तरावर सुरू आहेत. अद्याप अपूर्ण असलेल्या १५९ गावांतील सर्व शिल्लक कामे २५ नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिले. या बैठकीस तालुकास्तरावरील विस्तार अधिकारी, उपअभियंता, शाखा अभियंता उपस्थित होते.

# आष्टूर येथील अनेकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ नोव्हेंबर-**

लोहा तालुक्यातील येथील योगेश बाबर , नारायण बाबर, मंथन बाबर, पांडुरंग बाबर , राहुल कंधारे यांच्यासह अनेकांनी आज आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव सुनील नानवटे , जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे , युवक उत्तर जिल्हा अध्यक्ष स्वप्निल इंगळे , नांदेड उत्तर विधानसभा प्रमुख मोहन कांबळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनात्मक बांधणी आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. कोणत्याही परिस्थितीत लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या प्रत्येक गटावर आणि पंचायत समितीच्या प्रत्येक गणावर राष्ट्रवादी काँग्रेसचा विजयी ध्वज फडकला पाहिजे यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे काटेकोर नियोजन सुरू आहे. यातच अनेक राजकीय पक्षातील वरिष्ठ मंडळींचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश होण्याचा सपाटा सुरूच आहे. यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे नियोजन मोठ्या प्रमाणात सुरू असून आज लोहा तालुक्यातील आष्टूर येथील अनेक सक्रिय कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे . पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जोरदार कामाला लागा जो जास्त काम करेल त्याला निश्चितपणे उमेदवारी देण्यासाठी सकारात्मक विचार केला जाईल असा विश्वास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी वेळी कार्यकर्त्यांना दिला आहे.

# मुदखेड नगर परिषदेच्या निवडणूकीसाठी निवडणूक यंत्रणा सज्ज

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ७ नोव्हेंबर-**

मुदखेड नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ दि.२ डिसेंबर रोजी होणार असून मागील तीन वर्षापासून खंडित असलेली नगरपरिषदेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली असून महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने अलीकडच्या काळात महाराष्ट्र राज्यातील रखडलेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका दि.२ डिसेंबर रोजी घेणार असून यासंबंधी दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी नगरपरिषदेच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगांवकर यांनी स्थानिक माध्यम प्रतिनिधी आणि पत्रकारांशी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून निवडणूक विभागाने पूर्णपणे तयारी केली असून निवडणूक घेण्यासाठी सज्ज असल्याची माहिती देत




नगरपरिषदेची निवडणूक पारदर्शकपणे आणि निष्पक्षपणे पार पाडली जाईल आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जगदीश दळवी आणि नायब तहसीलदार मारोतराव जगताप निवडणूक प्रक्रियेत सहाय्यक म्हणून आपली भूमिका बजावतील.

सविस्तर वृत्त असे की नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ संबंधी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले की शहरात एकूण १० प्रभागाची रचना करत एकूण २१,५४९ असून त्यात १०,७२७ पुरुष असून स्त्री मतदारांची संख्या ११,०१९ अशी असून निवडणूक आयोगाने निश्चीत केलेल्या र्हीींिः// ारहरीशलशश्रशल.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने नामनिर्देशनपत्र भरणा करणे व भरणा केलेले नामनिर्देशन पत्राची छायांकीत प्रत स्वाक्षरीनिशी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दि. १० नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर या कालवधीत सुटीचे दिवस वगळून दुपारी ३:०० वा.पर्यंत सादर करावयाची असल्या बाबत माहिती दिली.

नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची माहिती प्रसिध्द करण्याचा दिनांक १८ नोव्हेंबर, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपिल नसेल तेथे १९ नोव्हेंबर ते दि.२१ नोव्हेंबर दुपारी ३:०० वा. पर्यंत., निवडणूक चिन्ह नेमूण देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक २६ नोव्हेंबर मतदानाचा दिनांक २ डिसेंबर सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वा पर्यंत. मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक ३ डिसेंबर इ. बाबत माहिती सांगितली.

निवडणुकीची घोषणा होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून त्याचा सर्वांनी काटेकोरपणे पालन करत निवडणूक प्रक्रिया ही शांततेत व सुरळीतपणे पार पडणेसाठी सर्वांनी सहकार्य करावेत असे आह्वान निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देवळगाव कारणे यांनी यावेळी दिले.

**विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार**

मुदखेड नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी नाम निर्देशन पत्र वाटप आणि स्वीकारणे नगरपरिषदेच्या विशेष कक्ष स्थापनकरण्यात येणार असून नगरपरिषदेची मतमोजणी दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता पासून सुरू होणार असून ही मतमोजणी नगरपरिषदेच्या सभागृहात पार पाडण्यात येईल अशी माहिती या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.